RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026


❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२०० वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि.४ सप्टेंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## देशातील पहिल्या मराठी विद्यापीठाचे कुलगुरू पदाचा मान अमरावतीच्या भूमिपुत्राला

### प्रथम कुलगुरूपदी डॉ.अविनाश आवलगावकर यांची नियुक्ती; ११ विषयांत संशोधन, संत साहित्याचा प्रचंड अभ्यास

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४ अमरावती**

मराठी भाषेविषयी चिंता व्यक्त केली जात असताना महाराष्ट्रासाठी एक चांगली बातमी समोर आली आहे. भारतातील पहिल्या मराठी विद्यापीठाची निर्मिती केली जाणार आहे. विशेष म्हणजे मराठी विद्यापीठाच्या पहिल्या कुलगुरू पदाचा मान हा अमरावतीच्या भूमिपुत्राला मिळाला आहे. मराठी विद्यापीठाच्या प्रथम कुलगुरूपदी उच्च व तंत्र शिक्षण विभागाने मूळचे अमरावती जिल्ह्यातल्या वरुड तालुक्यातील काठी येथील डॉ.अविनाश आवलगावकर



यांची प्रथम कुलगुरू म्हणून नियुक्ती केली आहे. देशातल्या पहिल्या मराठी विद्यापीठाच्या कुलगुरूपदी अमरावतीच्याच मराठी भूमिपुत्राला कुलगुरू म्हणून जबाबदारी मिळाल्याने सर्वत्र आनंदाचे वातावरण आहे. तेलगू, तामिळ, हिंदी, संस्कृत, कन्नड या भाषांची विद्यापीठ सध्या भारतात अस्तित्वात आहेत. मराठीचं हे पहिलच विद्यापीठ आहे.

**कोण आहेत डॉ.अविनाश आवलगावकर?**

डॉ.अविनाश आवलगावकर हे मूळचे अमरावती जिल्ह्यातल्या वरुड तालुक्यातील राजुराबाजार पासून दोन किलोमीटरवर असलेल्या काठी या छोट्याशा गावचे. आवलगावकर यांचे वडील हे अमरावती जिल्ह्यातच शिक्षक म्हणून कार्यरत होते. अविनाश आवलगावकर १९९५ पासून पुण्याच्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात मराठी विभाग प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. त्यापूर्वी ते अहमदनगरच्या एका महाविद्यालयात देखील कार्यरत होते.

**'संशोधन महर्षी' उपाधीने सन्मानित**

महानुभाव साहित्यावर डॉ.अविनाश आवलगावकर यांचा विशेष अभ्यास आहे, गेल्या वर्षी त्यांना नागपूरच्या विदर्भ संशोधन मंडळाने 'संशोधन महर्षी' या उपाधीने सन्मानित करण्यात आल होतं. महानुभाव साहित्य, संत साहित्य आणि आधुनिक साहित्यात त्यांचे विशेष योगदान आहे. मराठी भाषा, साहित्य, संस्कृतीला चालना देण्यासाठी आपण विशेष प्रयत्न करणार असल्याची माहिती त्यांनी दिली. भाषा हे केवळ संपर्क साधन नसून तिला एक सांस्कृतिक मूल्य आहे. ते मूल्य समाजामध्ये रुजवण्यासाठी या विद्यापीठाच्या माध्यमातून खूप काही प्रयत्न करता येतील, असेही डॉ. आवलगावकर यांनी अधोरेखित केले.

**परिचय**

डॉ. अविनाश वामन आवलगावकर
जन्म - १ जुलै १९५८
प्रकाशित पुस्तके - किलबिल (काव्यसंग्रह),
१९८४-८५ सालचा महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार
सांजबावरी (काव्यसंग्रह)
श्रीगोविंदप्रभुविषयक साहित्य - शोघ आणि समीक्षा
वि.स. खांडेकरांची कविता
वि.स.खांडेकरांचे साहित्य - एक आकलन (संपादन)
मराठीचे भवितव्य (संपादन)
मराठी साहित्य - संशोधनाच्या नव्या दिशा
महानुभाव साहित्य - शोधसंचार
संशोधनाचे विषय... (काम सुरू)
श्रीगोविंदप्रभुचरित्र ४५० लीळांचे संशोधन आणि संपादन
केसरी उद् बोधविरचित सिद्धांसार
महानुभाव कवी आणि त्यांची साहित्यविषयक भूमिका
महानुभावांचे ओवी वाङ्मय
ज्ञानदेवांचे शुकाष्टक - दोन हस्तलिखिते
ज्ञानदेवांचे स्वात्मानुभूतीपर अभंग
कवी यंकु आणि त्याची अभंगरचना
शेख महंमदकृत साठीसंवत्सर
महानुभावांची साठी संवत्सरे

**संशोधन -**

श्रीगोविंदप्रभुचरित्र - संशोधन आणि संपादन या शोधप्रकल्पासाठी विद्यापीठ अनुदान मंडळाची संशोधनवृत्ती

महानुभावांचे स्फुट साहित्य - संशोधन आणि संपादन या शोधप्रकल्पासाठी विद्यापीठ अनुदान मंडळाकडून रिसर्च करिअर ॲवॉर्ड प्राप्त.

## बंदुकीचा धाक दाखवीत भर दिवसा सराफा व्यवसायीकाला लुटले

### नवसारी जवळील जवाहर नगर येथील रेखा कॉलनीत घडली धक्कादायक घटना




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ४ अमरावती**

अमरावती शहरात ४ सप्टेंबरच्या भरदिवसा सराफा व्यवसायिकाला बंदुकीचा धाक दाखवून त्याच्या जवळील चक्क २५ किलोची चांदीचे आभूषण असलेली बॅग हिसकावून लुटारू पसार झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे ,, हि खळबळजनक घटना नवसारी परिसरात असलेल्या जवाहर नगर येथील रेखा कॉलनीत सकाळी ११ वाजताच्या दरम्यान घडली ,, या झटापटीत सुनील जावरे यांचे वडील आणि भाऊ जखमी झाले ,, अज्ञात लुटारू २ दुचाकी आणि कारने आल्याची माहिती सुनील जावरे यांनी दिली ,,, दोघांना वाचविण्यासाठी धाव घेण्याऱ्या एका मुलीला सुद्धा लुटारूंनी मारहाण केल्याचे सांगण्यात येत आहे.

अमरावती शहरात भरदिवसा अगदी वर्दळीच्या परिसरात पिस्तूल चा दाखवून सराफा व्यवसायिका ला लुटण्याची खळबळजनक घटना ४ सप्टेंबरच्या सकाळी ११ वाजताच्या दरम्यान घडली ,,, हि घटना नवसारी जवळील जवाहर नगर मध्ये असलेल्या रेखा कॉलनीत घडली ,,, हर्षराज कॉलनीत अनेक वर्षांपासून सराफा व्यावसायिक असलेले फिर्यादी अरविंद उत्तम जावरे यांचा गेल्या २८ वर्षांपासून दुकान आहे .. अरविंद जावरे हे त्यांचे ८० वर्षीय वडील उत्तम राव उखडराव जावरे यांना सोबत घेऊन ॲक्टिवा दुचाकीने दुकानाच्या दिशेने निघाले ,, सोबत एका बॅगेत चांदीचे आभूषण तर दुसऱ्या बॅगेत सोने सह नगदी रक्कम ची बॅग घेऊन जात असताना ,, घराच्या काहीच अंतरावरील वळण रस्त्यावर २ दुचाकी वर आलेले लुटारू आधीच लक्ष देऊन होते एकाने दुचाकी ला लाथ मारल्याने फिर्यादी अरविंद जावरे आणि त्यांचे वडील रस्त्यावर पडले तेवढ्यात एका अज्ञात लुटारूने लगेच चांदीच्या बॅगेकडे धाव घेऊन ती दुसऱ्या लुटारू जवळ फेकली तर त्याने उभी असलेली कार मधील एका व्यक्ती कडे फेकली ,, या वेळी जावरे यांनी आपल्या जवळील दुसरी बॅग त्याच परिसरातील ओळखीच्या व्यक्तीच्या अंगणात फेकून जोराने ओरडले ,, बॅग वर लक्ष द्या गेट उघडू नका असे सांगून अरविंद जावरे यांनी लुटारू च्या अंगावर धावून गेले ,, चार लुटारू जवळ जंगलेली पिस्तूल असल्याचे यावेळी अरविंद जावरे यांनी सांगितले एकाने जावरे यांच्या तोंडावर पिस्तूल ची मूठ मारून जखमी केले तर वडिलांना सुद्धा मारहाण करण्यात आली . घटना स्थळी नागरिक जमा झाल्याने त्यांना सुद्धा पिस्तूल ची धमकी देण्यात आली. याच दरम्यान एका मुलीने बचाव साठी धाव घेतली असता तिला सुद्धा मारहान केल्याची माहिती समोर येत आहे अज्ञात ८ ते १० लुटारू नी २५ किलो चांदी आभूषण ची अंदाजे किमती २५ लाखाची बॅग घेऊन वेगवेगळ्या दिशेने पसार झाले ,

नागरिकांनी तात्काळ फिर्यादी चे भाऊ सुनील जावरे याना माहिती दिली ,, या प्रकरणाची माहिती मिळताच गाडगे नगर पोलीस गुन्हे शाखा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली .. फिर्यादी अरविंद जावरे यांच्या तक्रारीवरून गाडगे नगर पोलिसांनी अज्ञात लुटारू विरोधात भारतीय न्याय संहिता अंतगत गुन्हे दाखल केले आहे ,,, या प्रकरणात आता गाडगे नगर पोलिसांसह गुन्हे शाखा पोलीस आरोपीच्या शोधात वेगवेगळ्या दिशेने रवाना झाले. पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी घटना स्थळाची पाहणी करीत जावरे यांची विचारपूस करीत केली

## बलात्काऱ्यांना १० दिवसांत फाशी; विधानसभेत विधेयक मंजूर, कायद्यात महत्वाची तरतूद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४कोलकाता**

पश्चिम बंगालच्या कोलकाता येथील बलात्कार आणि हत्या प्रकरणामुळे देशभर संतापाची लाट उसळल्याचं दिसून आलं. तर, महाराष्ट्रातील बदलापूर येथील बाललैंगिक अत्याचाराच्या घटनेनंतर राज्य सरकारनेही शाळेसंदर्भात कडक नियमावली जारी केली आहे. त्यामुळे, महिलांवरील अत्याचाराच्या बाबतीत सर्वच सरकार गंभीर बनल्याचं दिसून येतं. त्यातच, पंतप्रधान नरेंद्र मोदींनीही गेल्याच आठवड्यात आपल्या भाषणात महिलांवरील अत्याचाराच्या घटनांवर भाष्य केलं होतं. आता, पश्चिम बंगालमधील ममता सरकारने महिला अत्याचारसंदर्भाने विधानसभा सभागृहात अँटी रेप बिल मंजूर करण्यात आलं आहे. या नव्या कायद्यानुसार ३६ दिवसांत बलात्काराच्या गुन्ह्यातील तपास पूर्ण होणार आहे. तर, पीडित महिलेचा मृत्यू झाल्यास किंवा ती कोमात गेल्यास १० दिवसांता दोषींना फाशी देण्याची तरतूद पश्चिम बंगालमधील या अँटी रेप विधेयकात करण्यात आली आहे. त्यामुळे, महिलांवरील अत्याचाराच्या घटनांबाबत मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी मोठ पाऊल उचलल्याचं दिसून येतं.




कोलकाता येथील बलात्कार आणि हत्येच्या घटनेनंतर मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी आज पश्चिम बंगाल विधानसभेत बलात्कार विरोधी विधेयकावरील चर्चेत सहभाग घेतला. यावेळी, कोलकाता प्रशिक्षणार्थी बलात्कार आणि हत्या प्रकरणात आम्ही सीबीआयकडून न्यायाची अपेक्षा करतो. दोषींना फाशीची शिक्षा ठोठावण्यात यावी, असे ममता यांनी म्हटले. तत्पूर्वी, आज अपराजिता विधेयक म्हणजेच अँटी रेप विधेयक (-पींळ ीरशि इळश्रश्र) विधानसभेत मंजूर करण्यात आले आहे. त्यामुळे, आता राज्यपाल महोदयांच्या स्वाक्षरीनंतर राज्यात अँटी रेप कायदा लागू होईल. या अँटी रेप बिलास अपराजिता महिला व बाल विधेयक २०२४ असं नाव देण्यात आल आहे. राज्य सरकारने हे विधेयक मंजूर करण्यासाठी २ सप्टेंबरपासून दोन दिवसीय विशेष अधिवेशन बोलवले होते. कायदामंत्री मलय घटक यांनी विधानसभेत हे विधेयक सादर केले.

कोलकाता येथील आरजी मेडिकल कॉलेज आणि रुग्णालायात ८ ऑगस्ट रोजी येथील एका प्रशिक्षणार्थी डॉक्टरवर बलात्कार करुन तिची हत्या करण्यात आली होती. त्यानंतर, देशभरातली डॉक्टर्स संघटना आणि जनतेनं या घटनेवरुन तीव्र संताप व्यक्त करत आंदोलने केली. अनेक राजकीय पक्षांनीही महिला अत्याचाराच्या घटनांवर आवाज उठवत राज्यात कडक कायदा लागू करण्याची मागणी केली होती. बलात्काऱ्यांना तात्काळ फाशी देण्याची मागणी पीडित कुटुंब व महिला वर्गाकडून केली जात होती. पश्चिम बंगालमध्ये या घटनेचे तीव्र पडसात उमटले, तसेच मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी बलात्कार प्रकरणातील दोषींना फाशीची शिक्षा देण्याचा कायदा करावा, अशी मागणीही केली जात होती. या सर्व घटनांची दखल घेत पश्चिम बंगाल सरकारने बलात्कार विरोधी विधेयक सादर केले.

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात निवडणूक लढविणार; मंत्री गिरीश महाजन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४नांदेड**

वडेट्टीवार काय म्हणतील यावर आमची युती अवलंबून नाही. वडेट्टीवार याचं लोक ऐकणार नाहीत. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री आहेत, ते आमचे नेते आहेत. आम्ही शिंदे यांच्या नेतृत्वाखालीच राज्यात निवडणुका लढवणार आहोत. जागा वाटपाचा निर्णय, आमच्या तिन्ही पक्षातील पक्षश्रेष्ठी घेतील; अशी प्रतिक्रिया ग्रामीण विकास मंत्री गिरीश महाजन यांनी दिली.



नांदेड जिल्ह्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे शेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे. या नुकसानीची पाहणी करण्यासाठी जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन आले होते. यावेळी माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी प्रतिक्रिया दिली आहे. घोडा मैदान समोर आहे. त्यावेळी समजेल कोणाच्या किती जागा येतील. परंतु महायुतीतून आम्ही सर्व एकत्र लढणार आहोत आणि मोठ्या संख्येने आमच्या जागा निवडून येतील; अशा विश्वास गिरीश महाजन यांनी व्यक्त केला.

## नोव्हेंबरमध्ये महाराष्ट्रात निवडणुका, मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी केले सूतोवाच

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४मुंबई**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुका नेमक्या कधी होणार? याविषयी अद्याप निवडणूक आयोगाकडून कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही. जम्मू-काश्मीर व हरियाणा विधानसभा निवडणुकांची घोषणा करताना महाराष्ट्रातील निवडणुकांबाबत नंतर घोषणा केली जाईल, असा उल्लेख निवडणूक आयोगानं केला. मात्र, याबाबत अद्याप निवडणूक आयोगानं कोणतीही ठोस घोषणा केलेली नाही. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी निवडणुका नोव्हेंबर महिन्यात होणार असल्याचं मोठं विधान केलं आहे. त्यामुळे तर्क-वितर्कांना उधाण आलं आहे.

केंद्रीय निवडणूक आयोगानं गेल्या महिन्यात घेतलेल्या पत्रकार परिषदेत जम्मू-काश्मीर व हरियाणा या राज्यांमधील विधानसभा निवडणुकांची घोषणा केली. त्यानुसार, १८ सप्टेंबर ते ८ ऑक्टोबर या कालावधीमध्ये जम्मू-काश्मीरमध्ये तीन टप्प्यांमध्ये निवडणुका आणि त्यांचे निकाल लागणार आहेत. त्याचवेळी



हरियाणामध्ये एकाच टप्प्यात राज्यभरातील मतदारसंघामध्ये मतदान होऊन त्यांचेही निकाल जम्मू-काश्मीरबरोबरच लावले जातील. आधी १ ऑक्टोबर रोजी हरियाणात मतदानाची तारीख जाहीर केली होती. मात्र, नंतर त्यात बदल करून ती ५ ऑक्टोबर करण्यात आली आहे.

**महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांबाबत मुख्यमंत्र्यांचं मोठं विधान**

दरम्यान, जम्मू-काश्मीरमधील निवडणुकांची घोषणा करताना महाराष्ट्रातील निवडणुकांच्या तारखांबाबत निवडणूक आयोगानं कोणतीही ठोस माहिती दिली नव्हती. आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर या राज्यांमधील निवडणुका पुढे ढकलल्याचाही उल्लेख आयोगानं केला. मात्र, आता खुद्द महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीच राज्य विधानसभा निवडणुकांबाबत मोठं विधान केलं आहे. दिलीप लांडेंबाबत बोलताना मुख्यमंत्र्यांनी आगामी निवडणुकांमध्ये विजयी करण्याचं आवाहन उपस्थितांना केलं. तेव्हा त्यांनी निवडणुकांच्या तारखांचा संदर्भ दिला. आता दोन महिन्यांत निवडणुका आहेत ना? नोव्हेंबरमध्ये. तेव्हा आपण सगळ्यांनी प्रचंड मताधिक्याने दिलीप लांडेंच्या मागे उभं राहायचं, असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी केलं.

## संपादकीय ......

# बलात्कारी वृत्ती बळावण्याच्या मुळाशी पॉर्नचे व्यसन!


कोलकाता बलात्कार मर्डर केसमुळे मी निराश आणि भयभीत आहे, हे विधान कोणा सामान्य वर्किंग वुमन किंवा गृहिणीचे नाही, तर चक्क १३४ कोटी लोकसंख्या असलेल्या जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या भारत देशाच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे आहे. देशाचे नेतृत्व करणार्या राष्ट्रपती जर देशातील बलात्कार आणि हत्यांसारख्या घटनांमुळे व्यथित आणि भयभीत होत असतील तर सामान्य महिलांच्या अवस्थेबद्दल न बोलणेच बरे.कारण सध्या देशात पॉर्नोग्राफीमुळे महिलांवरील अत्याचारांच्या घटना वाढल्याने देशच हादरला आहे. आजची देशातील परिस्थिती ही १६ डिसेंबर २०१२ साली दिल्लीत घडलेल्या निर्भया प्रकरणानंतर उसळलेल्या अस्थिर आणि अगतिकतेची पुनरावृत्ती आहे, असं म्हटल्यास वावगं ठरणार नाही.कारण निर्भया प्रकरणातील गुन्हा आणि यातील आरोपींनी केलेली क्रूरता बघून कायद्यात बदल करण्यात आले होते. यामुळे काही काळासाठी विकृत मनोवृत्तीला कायद्याचा वचक बसला. परिणामी महिलांवरील अत्याचार कमी झाल्याचे आभासी चित्र निर्माण झाले, पण खरंतर त्यावेळी निर्भयावर रेप कसा झाला आणि तिच्या गुप्तांगात रॉड कसा घुसवण्यात आला याचे व्हिडीओ सर्च करण्यात इतर देशांपेक्षा भारतीयच अव्वल होते. लज्जास्पद म्हणजे कोलकाता येथील रेप, मर्डरनंतरही डॉक्टर रेप व्हिडीओ कोलकाता हे किवर्ड वापरून व्हिडीओ सर्च केले गेले आणि आजही सर्च केले जात आहेत.त्यामुळे कायद्यात कडक तरतुदी करूनही विकृत मनोवृत्तीला वेसन घालण्यात आपण सपशेल फेल ठरतोय हे मान्य करावे लागेल. तज्ज्ञांच्या मतानुसार या सगळ्याचं कारण ठरतंय देशातलं पॉर्न कल्चर, पॉर्न ॲडिक्शन. यामुळे निर्भया प्रकरण असो की कोलकाता बलात्कार मर्डर किंवा बदलापूरमधील चिमुरडींवरील लैंगिक अत्याचार वा त्यानंतर घडलेल्या महिला अत्याचारांच्या घटनांचे सारे धागेदोरे हे आरोपींच्या पॉर्न ॲडिक्शनशी जुळलेले आहे.

आपल्या देशात उघडपणे पॉर्न बघण्याचा ट्रेंड सुरू झाला तो २०१४ पासून. त्याआधी यावर कोणी सहसा बोलत नसे, पण अश्लील पुस्तके, मॅगझिन मात्र वाचली जात. त्याचा वाचक वर्ग वेगळा होता, पण निर्भया घटनेनंतरच्या काळात देशात डिजिटल क्रांती इतकी प्रगत झाली की छुप्या कॅमेर्यातून दुसर्याच्या थेट बेडरूमची दृश्य आपल्याच घरात बसून मोबाईलवर पाहता येऊ लागली आहेत. यामुळे आंबटशौकिन अधिकच चाळवले, तर दुसरीकडे पॉर्न इंडस्ट्रीही बोकाळली. मोबाईलवरच हे विकृत चाळे सहज पाहता येत असल्याने आपल्या देशात इतर देशांच्या तुलनेत पॉर्नचा फॉलोअर वाढला.

विशेष म्हणजे हा फॉलोअर फक्त विकृत किंवा वासनांध व्यक्ती, तरुणाईच नाही तर घराघरातील पुरुष आणि महिलाही या पॉर्नच्या व्यसनात अडकल्या. कारण आपल्याकडे सेक्सबद्दल मोकळं बोलणं नाही, त्यावर चर्चा नाही की शिक्षणही नाही. त्यामुळे हे बंद दरवाजाआडचे पॉर्न बघण्यात भारतीय पुरुषच नाही तर महिलांचे प्रमाण हे इतर देशातील महिलांच्या तुलनेत आजही अधिक आहे. तज्ज्ञांच्या मतानुसार यामागे बेकारी, अज्ञान, मानसिकता यांसारखी अनेक कारणे जरी असली तरी याचा परिणाम घरातील मुलांवरही झालाय.त्यामुळे बालक, महिलांवरील अत्याचारही वाढले. याची दखल घेत २०१८ साली केंद्र सरकारने ८२७ ॲडल्ट पॉर्न साईट्सवर बंदीही घातली. यावर पॉर्न फिल्मवाल्यांनी शक्कल लढवत छुप्या पद्धतीने पॉर्न फिल्मचा पुरवठा भारतीयांना करण्यासाठी नवे नवे मार्ग शोधले. सरकारी बंदीमुळे फक्त त्या ८२७ पॉर्न साईट्स दिसणे बंद झाले, पण त्यांची जागा लहान मुलं, प्रणयांवरील पॉर्न फिल्म्सनी घेतली. परिणामी लहान मुलं या पॉर्नला बळी पडू लागली.त्याचे परिणाम एनसीआरबीच्या आकड्यातून स्पष्ट झाले. २०१७-२०२१ या पाच वर्षांच्या काळात देशभरात झालेल्या बलात्कार प्रकरणात ७,१११ मुलं ही अल्पवयीन आरोपी आहेत. विशेष म्हणजे यातील काही मुलं सुशिक्षित, घरंदाज कुटुंबातीलही आहेत.यातील ९० टक्के आरोपींनी पॉर्न बघून हे कृत्य केल्याची कबुली दिली. यावरून नवीन पिढी पॉर्नच्या विळख्यात अडकल्याच्या दाव्यावर एकप्रकारे शिक्कामोर्तब झालं असून आपण किती असुरक्षित समाजात वावरत आहोत याचे हे प्रमाण आहे.

अगदी काल परवा घडलेले कोलकाता येथील डॉक्टर रेप, मर्डर प्रकरण, उत्तराखंडमधील नर्स रेप मर्डर, बदलापूर येथील नामांकित शाळेत दोन चिमुरडींवर झालेला लैंगिक अत्याचार, त्यापाठोपाठ कांदिवलीत गतिमंद मुलीवर झालेला अत्याचार, वसईत १६ वर्षांच्या अल्पवयीन मुलाने दुसरीत शिकणार्या मुलीवर केलेला अत्याचार, यूपीमध्ये १५ वर्षांच्या दोन शाळकरी मुलांनी दुसरीत शिकणार्या मुलीवर बलात्कार करून तिची केलेली हत्या, ७० वर्षांच्या आज्जींवर झालेला लैंगिक अत्याचार हादेखील पॉर्न कल्चरमधून झाल्याचे पोलीस चौकशीत समोर आले आहे.तर दुसरीकडे ज्या पॉर्न आणि बेबंद वेबसीरिज बघून वासनांध आरोपींना हे कृत्य करण्याचं बळ मिळालं आणि मिळत आहे त्यावर विचार करण्याची ही वेळ आहे. यामुळे जर या विकृतीचा नाश करायचा असेल तर तो फक्त कडक कायदे, आरोपींना शिक्षा देऊन होणार नाही किंवा मानसिकता बदलण्याच्या बाता मारून होणार नाही, तर त्यासाठी काही तांत्रिक ठोस उपाययोजना हव्यात, अन्यथा गुन्हेगारी वृत्ती आणि विकृत मानसिकता असलेली पिढी कधीच संपणार नाही. एकानंतर दुसरा तयार होत राहणार आणि स्त्री अत्याचाराच्या या शृंखला कधीच तुटणार नाहीत, मग त्याच मानसिकतेचे अनुकरण करीत त्याच स्टाईलने त्याच प्रकारचे गुन्हे घडत राहतात. प्रामुख्याने लहान वयापासूनच ही मानसिकता विकसित होत असते. त्यात सोशल मीडियावरील ॲडल्ट कंटेंट आगीचे काम करीत आहेत.

# कपाशीच्या शेतामधील झाडे अचानक जागेवर सुकू लागली आहेत काय कराल उपाय



कापसात आलाय 'मर'

**दि.४विदर्भ प्रजासत्ताक** बऱ्याच ठिकाणी झालेल्या पाऊसानंतर कपाशीच्या शेतामधील झाडे अचानक जागेवर सुकू लागलेली आहेत. याला आकस्मिक मर असे म्हणतात. कपाशीच्या आकस्मिक मर मध्ये दीर्घकाळ पाण्याचा ताण पडल्यानंतर जमिनीचे तापमान वाढलेले असते. अशावेळी सिंचन दिल्यास अथवा पाऊस पडल्यास झाडाला धक्का बसून अचानक झाड सुकते आणि कालांतराने झाडाची पाने गळतात.

सिंचन दिल्यानंतर किंवा पाऊस पडल्यानंतर ३६-४८ तासांत आकस्मिक मर ची लक्षणे दिसू लागतात. सुकल्यानंतर पानगळ होऊन कालांतराने झाडे मरतात त्यामुळे उत्पादनात मोठे नुकसान होऊ शकते.

**आकस्मिक मर व्यवस्थापन**

१) अतिरिक्त पाण्याचा लवकरात लवकर निचरा करवा.

२) वापसा येताच कोळपणी व खुरपणी करावी.

३) लवकरात लवकर २०० ग्रॅम युरिया + १०० ग्रॅम पांढरा पोटॅश (००:००:५० खत) + २५ ग्रॅम कॉपर ऑक्सीक्लोराईड प्रति १० लिटर पाण्यात मिसळून तयार द्रावणाची प्रति झाड १०० मिली याप्रमाणे आळवणी करावी. किंवा १ किलो १३:००:४५ + २ ग्रॅम कोबाल्ट क्लोराईड + २५० ग्रॅम कॉपर ऑक्सीक्लोराईड २०० लिटर पाण्यातून मिसळून तयार द्रावणाची प्रति झाड १०० मिली आळवणी करावी.

४) वरीलप्रमाणे द्रावणाची आळवणी केल्यानंतर सुकू लागलेल्या झाडाजवळची माती पायाने लवकरात लवकर दाबून घ्यावी.

वरील सर्व उपाययोजना शेतामध्ये झाडे सुकू लागलेली दिसताच लवकरात लवकर म्हणजे २४ ते ४८ तासाच्या आत कराव्यात जेणेकरून पुढील होणारे मोठे नुकसान वेळीच टाळता येईल.

**डॉ.जी.डी.गडदे,डॉ.डी.डी.पटाईत**
**श्री.एम.बी.मांडगे**
कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र, परभणी




# लघवीचा रंग बदलणं कधी असते धोक्याची घंटा? जाणून घ्या कसा रंग दिसल्यावर वाढू शकते चिंता!

**दि.४विदर्भ प्रजसत्ताक** लघवीच्या माध्यमातून आपल्या शरीरातील विषारी पदार्थ आणि जास्तीचं पाणी बाहेर पडत असतं. सामान्यपणे लघवीचा रंग हलका पिवळा असतो. पण जर हा रंग बदलला तर आरोग्य धोक्यात येऊ शकतं. शरीर हायड्रेट असेल तर लघवीचा रंग ट्रान्सपरन्ट आणि हलका पिवळा दिसतो. पण जर तुमच्या लघवीचा रंग पूर्णपणे क्लीअर असेल तर याचा अर्थ तुम्ही पाण्याचं सेवन फार जास्त प्रमाणात करत आहात आणि अशात तुम्ही पाण्याचं सेवन थोडं कमी करावं.तुम्ही सकाळी उठून लघवी पास करत असाल तर लघवीचा रंग फार जास्त पिवळा दिसतो. याचा अर्थ हा आहे की, शरीरातील सर्व विषारी पदार्थ बाहेर पडले आहेत. पण सकाळच्या लघवीचा रंग जर पूर्णपणे क्लीअर दिसत असेल तर याचा अर्थ तुम्ही प्रमाणापेक्षा जास्त पाणी पित आहात. हे बरोबर करण्यासाठी तुम्ही पाण्याचं सेवन थोडं कमी करावं.त्याशिवाय इतरही काही कारणे आहेत ज्यामुळे लघवीचा रंग पूर्णपणे क्लीअर दिसतो. डायबिटीस इंसिपिडस एक असामान्य आजार आहे ज्यामुळेही शरीरातील फ्यूइडचं प्रमाण अनियंत्रित होतं. यात व्यक्तीला फार जास्त तहान लागते आणि पुन्हा पुन्हा लघवी लागते.




**क्लीअर लघवी आणि मद्यसेवन**

यूरोलॉजी केअर फाउंडेशनमध्ये सांगण्यात आलं आहे की, ड्यूरेटिक मेडिकेशनमुळेही पुन्हा पुन्हा लघवीच्या समस्येचा सामना करावा लागतो.

सोबतच यात लघवीचा रंगही क्लीअर दिसू लागतो. नॅशनल असोसिएशन फॉर कॉन्टिनेन्समध्ये सांगण्यात आलं आहे की, दारूचाही ड्येरिटिक इफेक्ट होतो. दारूचं सेवन केल्याने लघवी जास्त वेळ येते आणि पुन्हा पुन्हा लघवी केल्याने लघवीचा रंगही क्लीअर दिसू लागतो. यूएस नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिनने जास्त लघवी करणे आणि दारूचं सेवन यातील संबंध सांगितला आहे.

# डाळिंब पिकातील रसशोषक किडींचा कसा कराल बंदोबस्त

**दि.४विदर्भ प्रजासत्ताक** डाळिंब हे प्रामुख्याने अवर्षणप्रवण भागात शेतकऱ्यांना अति फायदेशीर ठरणारे फळपीक आहे. महाराष्ट्रातील समशीतोष्ण हवामानामुळेडाळिंब झाडास वर्षातून केंव्हाही फुले येतात.

त्यामुळे मृग बहार (जून-जुलै), हस्त बहार (सप्टेंबर-ऑक्टोबर), आंबे बहार (जानेवारी-फेब्रुवारी) यापैकी व्यापारीदृष्ट्या तसेच बाजारातील विविध फळांची उपलब्धता पाहून कोणताही बहार घेता येतो.

या फळपिकाला वर्षभर फुले व फळे येतात त्यामुळे किडिंना सतत खाद्य उपलब्ध होत असल्याकारणाने किडींचा प्रादुर्भाव सातत्याने वाढलेला दिसून येतो. यासाठी किटकनाशंकाचा कमीत कमी वापर करून एकात्मिक पद्धतीने कीड व्यवस्थापन केले पाहिजे.

**रसशोषक किडी**

**१) फुलकिडे**

या किडीचा आकार लहान असून लांबट निमुळते शरीर असते. या किडीचा प्रादुर्भाव ओळखण्याकरिता झाडावरील नवीन पालवी व उमललेले फूल जर आपण तळहातावर झटकले तर फुलकिड्यांचे असंख्य किडे आपल्या हातावर पडतात आणि ते आपल्याला डोळ्याने सहजपणे दिसतात. फुलकिड्यांची पिल्ले आणि प्रौढ पानांवरील कोवळ्या फांद्यावरील आणि फळांवरील पृष्ठभाग खरवडून त्यातून निघणारा रस शोषून घेतात. परिणामतः प्रादुर्भाव झालेली पाने वेडीवाकडी होतात. लहान फळांवर प्रादुर्भाव झाला असेल तर फळांचा पृष्ठभाग खरवडल्यामुळे शुष्क बनतो व फळांचा आकार जसा वाढत जातो तसा शुष्क भागाचा आकार वाढतो. यामुळे फळांचा आकर्षकपणा नाहीसा होऊन अशा फळांना बाजारात किंमत मिळत नाही.

**२) मावा**

ही कीड आकाराने लहान असून प्रजातीनुसार मावा किडीचा रंग हिरवा, पिवळा किंवा तपकिरी काळपट असतो. नवीन पालवी, कोवळ्या शेंड्यावर, फुलांवर व फळांवर या किडीचा प्रादुर्भाव दिसून यतो, पिल्ले व प्रौढ रस शोषून त्यावर उपजिविका करतात. यामुळे लहान कळ्या, फुले, फळे गळून पडतात. प्रादुर्भाव जर जास्त प्रमाणात झाला तर शेंडे चिकट होऊन त्यावर तसेच पानांवर काळ्या बुरशीची वाढ होते. थंडीच्या हंगामात डिसेंबर ते फेब्रुवारी या कालावधीत या किडीचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात दिसून येतो.

**३) पिठ्या ढेकूण**

पिढ्या ढेकणाचा रंग पांढरा असून त्याचा आकार अंडाकृती असतो. पूर्ण वाढ झालेल्या कीडीच्या अंगावर कापसासारखे आवरण असते. पिल्लांचा रंग विटकरी असतो. पिल्ले व प्रौढ फळांवर, देठांवर तसेच फळाच्या खालील पाकळीत कापसासारख्या आवरणाखाली पुंजक्याच्या स्वरूपात एका जागेवर राहून रस शोषण करते. या किडीच्या शरीरातून चिकट द्रव स्त्रावत असल्याने फळे चिकट होऊन त्यावर काळ्या बुरशीची वाढ होते. फळे लहान असताना जर जास्त प्रादुर्भाव झाला तर अशी फळे गळून पडतात. मोठ्या फळांवर प्रादुर्भाव झाला तर अशी फळे चिकट काळपट झाल्याने बाजारात विकण्यायोग्य रहात नाहीत. कळी अवस्थेतसुद्धा या किडीचा प्रादुर्भाव होतो. त्यावेळी कळ्या गळून पडतात. उष्ण आणि कोरड्या हवामानात या किडींचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात होतो.



डाळिंब पिकातील किडी

**४) पांढरी माशी**

पांढऱ्या माशीचे वास्तव्य पानांच्या मागील बाजूस असते. पानाच्या मागील बाजूस समूहाने या किडीचे पिल्ले आणि प्रौढ माशा राखाडी-पांढऱ्या रंगाच्या दिसून येतात. या किडींची पिल्ले पानातील पेशीद्रव्य शोषतात. तर प्रौढ माशी कोवळ्या पानातील पेशी द्रव्यावर उपजिविका करतात. या किडीची मादी माशी अतिसूक्ष्म अंडी पानांवर घालतात आणि त्यापुढील संपूर्ण जीवनक्रम झाडांच्या पानांवरच पूर्ण होतो. पानांवर चिकट द्रव स्त्रावणाने त्यावर काळ्या बुरशीची वाढ होऊन पर्यायाने झाडाची वाढ स्थिरावते.

**एकात्मिक व्यवस्थापन**

१) बाग स्वच्छ ठेवावी व तणांचा बंदोबस्त वेळीच करावा.

२) झाडांच्या छाटणीचे नियोजन अशा पध्दतीने करावे की जेणेकरून झाडांवर फांद्याची गर्दी होणार नाही तसेच फवारणी करतेवेळी किटकनाशकाचे द्रावण झाडाच्या संपूर्ण भागात पोहोचण्यास मदत होईल.

३) वर्षातून शक्यतो एकच बहार घ्यावा. इतर अवेळी येणारी फुले फळे तोडून नष्ट करावीत.

४) मृग बहारात किडींचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात असतो म्हणून शक्यतो मृग बहार घेणे टाळावे.

५) बागेच्या सभोवती बांधावरील किंवा नदीनाल्या किनाऱ्यावरील रस शोषणाऱ्या पतंगाच्या अळीला पुरक असणाऱ्या जंगली वनस्पतींचा नायनाट करावा. उदा. गुळवेल, वासनवेल.

६) सायंकाळच्या वेळी बागेत धूर करावा.

७) प्रकाश सापळ्याचा वापर करावा जेणेकरून आकर्षित झालेले पतंग पकडून नष्ट करावेत.

८) रस शोषक किडीवर उपजिवीका करणाऱ्या परोपजीवी किडींचे (क्रायसोपर्ला, ढालकीडा, क्रिप्टोलेमस, सिरफिड माशी इ.) संवर्धन करावे.

१०) ५ टक्के निंबोळी अर्काची किंवा १ टक्के नीम ऑईल (१०००० पीपीएम) फवारणी करावी.

११) रस शोषक पतंगाना बागेपासून परावृत्त करण्याकरिता सिट्रोनेला ऑईलचा वापर करावा.

१२) पिठ्या ढेकूण या किडीच्या नियंत्रणाकरिता व्हर्टिसिलीयम लेक्नी ४ ग्रॅम/लिटर या प्रमाणात परोपजीवी बुरशीची फवारणी करावी.

१३) पिठ्या किडीच्या नियंत्रणाकरिता किटकनाशकाच्या द्रावणात 'फिश ऑईल रेझीन' सोप प्रति लिटर २.५ ग्रॅम या प्रमाणात मिसळून फवारणी करावी.

१४) किटकनाशकाची फवारणी शक्यतो आवश्यकता असेल तेव्हाच करावी. त्याकरीता खालील दिलेल्या किटकनाशकांची १५ दिवसांच्या अंतराने फवारणी करावी.

# आयुष्मान भारत, जनआरोग्य योजनेचा नियोजनभवनात आढावा

## प्रत्येक गरजू रूग्णाला योजनेत उपचार मिळवून द्यावेत - डॉ. ओमप्रकाश शेटे

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४अकोला** आयुष्मान भारत व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेत शासकीय व खाजगी अंगीकृत रुग्णालयांमार्फत पात्र नागरिकांना नि:शुल्क वैद्यकीय सेवा पुरविण्यात येत आहेत. आरोग्य विमा योजनेची व्याप्ती वाढवण्यात आली आहे. आयुष्मान कार्ड वितरणात अकोला जिल्हा आघाडीवर आहे. तथापि, एकही गरजू रूग्ण उपचारापासून वंचित राहू नये यासाठी कार्ड वितरणाची प्रक्रिया गतीने राबवावी, असे निर्देश आयुष्मान भारत मिशन समितीचे महाराष्ट्र प्रमुख डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी आज येथे दिले.

आयुष्मान भारत, प्रधानमंत्री जनआरोग्य योजना, महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी नियोजनभवनात आयोजित बैठकीत ते बोलत होते. जिल्हाधिकारी अजित कुंभार, जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी बी. वैष्णवी, अतिरिक्त जिल्हाधिकारी रामदास सिद्धभट्टी, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. तरंगतुषार वारे, निवासी उपजिल्हाधिकारी विजय पाटील, जिल्हा पुरवठा अधिकारी नीलेश खेमनार, महापालिका उपायुक्त मेघना वासनकर, डॉ. अभय पाटील, विजय अग्रवाल, डॉ. दीपक केळकर तसेच विविध रूग्णालयांचे प्रतिनिधी उपस्थित होते.



डॉ. शेटे म्हणाले की, जिल्ह्यात आयुष्मान कार्डचे ३५ टक्के वितरण झाले आहे. ते गतीने पूर्ण करावे. योजनेतील तरतुदींचा गरजूंना लाभ मिळण्यासाठी व्यापक दृष्टिकोन ठेवून कार्यवाही करावी. ऑर्थोपेडिक पॅकेजेसबाबत प्राप्त सूचनांचा विचार करून ते वाढविण्याचा निश्चित प्रयत्न करू. आरोग्यमित्रांनी व्यापक व संवेदनशील दृष्टी बाळगून गरजूंना उपचार मिळण्यासाठी प्रयत्न करावेत. स्व. बाळासाहेब ठाकरे अपघात विमा योजनेचा रूग्णांना लाभ मिळवून द्यावा. यावेळी रूग्णालय, डॉक्टर व आरोग्य मित्रांशीही त्यांनी चर्चा केली. महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेत ४ लक्ष ५८ हजार ४५१ शिधापत्रिकाधारक कुटुंब पात्र आहेत. प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेत १७ लक्ष २८ हजार ९८७ लाभार्थ्यांचा समावेश आहे. जिल्ह्यात ४ शासकीय व १९ खासगी अशी २३ रूग्णालये अंगीकृत आहेत, अशी माहिती योजनेच्या जिल्हा समन्वयक डॉ. शीतल गावंडे यांनी दिली. जिल्ह्यात अकोला, मूर्तिजापूर, अकोटप्रमाणे इतर तालुक्यांतही एक तरी मल्टिस्पेशालिटी रूग्णालय योजनेत वर्गीकृत करण्यासाठी प्रयत्न करण्याचे निर्देश जिल्हाधिका-यांनी यावेळी दिले. डॉ. शीतल गावंडे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. अश्विनी खडसे यांनी आभार मानले.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

बुधवार दि. ४ सप्टेंबर २०२४ शहर/ग्रामिण


# नागपूरच्या प्रसिद्ध मारबत मिरवणुकीला उत्स्फूर्त प्रतिसाद

## महिला अत्याचाराचा निषेध करणारे बडगे

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४ नागपूर–** विदर्भाचे वैभव असलेली आणि पौराणिक, ऐतिहासिक व सामाजिक महत्त्व असलेल्या मारबत– बडग्या मिरवणुकीला नागपूरकरांच्या अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. बदलापूर आणि कोलकाता येथील घटनेत महिलांवरील अत्याचाराचा निषेध करणारा आणि लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून महिलांची मत मिळवणाऱ्या महायुती सरकारच्या विरोधात बडगे यावर्षीचे खास आकर्षण होते. घेऊन जा गे बडग्या अशा घोषणा देत तरुणाई मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते.

दरवर्षी राजकीय नेत्यांवर भाष्य करणारे बडगे असतात, यावेळी मात्र एकही बडगा मिरवणुकीत नव्हता हे विशेष. शहराचा व्यापारी परिसर असलेल्या इतवारीतील जागनाथ बुधवारी परिसरातून सकाळी पिवळी मारबतीच्या मिरवणुकीला सुरूवात झाली. तर काळ्या मारबतची मिरवणूक नेहरू पुतळ्याजवळील पोहा ओळीतून सुरू झाली. काळी आणि पिवळी मारबतीचे नेहरू पुतळ्याजवळ मिलन झाल्यानंतर,



खऱ्या अर्थाने मिरवणुकीचा उत्साह शिगेला पोहचला होता. यावेळेचे खास आकर्षण म्हणजे बदलापूर आणि कोलकाता येथे महिलांवरील अत्याचाराच्या घटनेचा निषेध करणारे वेगवेगळ्या संघटनांचे सात बडगे मिरवणुकीत सहभागी झाले होते. या सर्व बडग्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. भाजपने राष्ट्रवादी व सेनेत फूट पाडली , आता महिलांना तीन हजार रुपये देऊन सत्ता मिळवण्याचे प्रयत्न करणाऱ्या महायुती सरकारचा निषेध करणारा बडगा विदर्भ क्रांती दलाने तयार केला होता.शहीद चौक ते शिवाजी महाराज पुतळा या मार्गावर मोठ्या प्रमाणात रस्त्याच्या दोन्ही बाजूने लोकांनी गर्दी केली होती. यशिवाय युवकांना नोकरी न देणाऱ्या सरकारचा बडगा आणि गंगाजमूना हटाव अशी मागणी करणाऱ्या बडग्याने सर्वाचे लक्ष वेधले. यासह काळी पिवळी मारबतीसह यावर्षी लाल मारबत मिरवणुकीत काढण्यात आली. छत्तीसगढी समाज बडग्या उत्सव मंडळ, तेला समाज बालमित्र बडग्या उत्सव मंडळ, सार्वजानिक बडग्या उत्सव मंडळ विदर्भ क्रांती दल,अविघ्न बडग्या उत्सव मंडळ आदी संस्थेच्या माध्यमातून बडगे काढण्यात आले.

१४४ वर्षांची ऐतिहासिक सांस्कृतिक आणि धार्मिक परंपरा व ऐतिहासिक सांस्कृतिक आणि धार्मिक परंपरा असलेला मारबत व बडग्या उत्सव सुरू झालेला आहे. समाजातील अनिष्ट रूढी प्रथांचे उच्चाटन करण्याचे हेतूने पोळ्याच्या पाडव्या ला म्हणजेच तान्हा पोळ्या ला मध्य आणि पुर्व नागपुरात या मारबतीची मिरवणूक काढली जात असल्यामुळे केवळ नागपुरातील नाही जिल्ह्या तील विविध गावागावा तून लाखो लोक मिरवणूक बघायला आले होते. वाईट रूढी परंपरा आणि अंधश्रद्धेचा दहन करून, चांगल्या परंपरा आणि विचारांचा स्वागत करणे म्हणजे मारबत उत्सव आहे. मारबत उत्सवाला महाभारताच्या काळात संदर्भ देखील दिला जात असल्यामुळे काळी व पिवळ्या मारबतीची अनेक महिलांनी ओटी भरुन दर्शन घेतले.

# महिलांना योग्य सन्मान मिळावा; दृष्टिकोन बदलण्याची गरज

## राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांचं आवाहन



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४मुंबई –** देशातील आणि राज्यातील महिलांवरील अत्याचाराच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांनी महिलांना योग्य सन्मान आणि प्रतिष्ठा मिळावी, अशी भावना बोलून दाखविली. महिलांकडे बघण्याची दृष्टी काही ठिकाणी संकुचित दिसते. ती बदलण्याची, सुधारण्याची जबाबदारी आपल्या सर्वांवर आहे. आज महिला जे काही सोसत आहेत, ते त्यांना पुढे जाऊन भोगावे लागू नये, असेही राष्ट्रपती म्हणाल्या.

महाराष्ट्रविधान परिषदेचा शतकमहोत्सव सोहळा मंगळवारी विधानभवनातील मध्यवर्ती सभागृहात पार पडला. यावेळी उत्कृष्ट संसदपटू, उत्कृष्ट वक्ते यांचा गौरव राष्ट्रपतींच्या हस्ते झाला. कार्यक्रमाला राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे उपस्थित होते.

मालवणात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा पडला, तेव्हा करोडो भारतीयांप्रमाणे माझ्या मनालाही वेदना झाल्या, परंतु जो पडला तो केवळ पुतळा होता. प्रत्येकाच्या हृदयात शिवाजी महाराजांचे स्थान अढळ असल्याची भावना राज्यपालांनी व्यक्त केली.

### 'गर्जा महाराष्ट्र माझा'

संविधानाच्या हस्तलिखिताच्या १५ व्या भागात छत्रपती शिवाजी महाराजांचे चित्र सुशोभित आहे. म्हणून संविधान व्यवस्थेशी निगडीत या कार्यक्रमात आम्ही शिवाजी महाराजांना विशेष नमन करतो, असे राष्ट्रपती म्हणाल्या. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या 'बहुत असो संपन्न की महा, प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा' या ओळींचा उल्लेख करत कवी राजा बढे यांच्या 'गर्जा महाराष्ट्र माझा' या गीताच्या ओळीही त्यांनी म्हटल्या.

# बार्शीत मनोज जरांगे यांना प्रश्न विचारणारे बॅनर झळकले

## मनोज जरांगेंना मराठा नेत्यांकडून ८ दिवसाचा 'अल्टिमेटम'

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४ बार्शी–** सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यात मराठा समाज बांधवाने डिजिटल फलक लावत मनोज जरांगे पाटील यांना प्रश्न विचारले आहे.आगामी विधानसभा निवडणुकीत मराठा समाजाने काय भूमिका घ्यावी.महायुतीला पाठिंबा द्यावयाचा महाविकास आघाडीला पाठिंबा द्यावयाचा?मराठा समाज विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने संभ्रमात पडला आहे. लोकसभा निवडणुकीत जरांगे पाटील यांनी सांगितल्या प्रमाणे महाविकास आघाडीला पाठिंबा दिला होता.मात्र महाविकास आघाडीकडून लोकसभा निवडणुकीनंतर मराठा आरक्षणाबाबत जाहिरपणे किंवा ठोस आश्वासन मिळाले नाही. जरांगे पाटील यांना प्रश्न विचारत बार्शी मधील अण्णासाहेब शिंदें या मराठा नेत्याने डिजिटल फलक लावले आहे.जरांगे पाटील यांनी खुलासा नाही केला तर,बार्शी मधील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासमोर ठिय्या आंदोलन करणार असल्याचा इशारा दिला आहे.




बार्शी तालुक्यातील मराठा नेते अण्णासाहेब शिंदे यांनी मनोज जरांगे पाटील यांच्याविरोधात उपोषणाला बसण्याचा इशारा दिला आहे. महाविकास आघाडीच्या नेत्यांना त्यांच्या जाहीरनाम्यात मराठ्यांना ओबीसीमधून आरक्षण देण्याबाबत आश्वासन देण्यासाठी सांगणार का? असा सवाल अण्णासाहेब शिंदे यांनी उपस्थित केला आहे. अण्णासाहेब शिंदें इतरही प्रश्न उपस्थित केले आहेत.मनोज जरांगे पाटील यांनी आठ दिवसात याचे उत्तर न दिल्यास मनोज जरांगे पाटील यांच्याविरोधात उपोषण करणार असल्याचा इशारा बार्शी मधील अण्णासाहेब शिंदें या मराठा नेत्याने दिला आहे.

**अण्णासाहेब शिंदें यांचे डिजिटल फलकात प्रश्न**

बार्शी मधील मराठा नेते अण्णासाहेब शिंदे म्हणाले, महाविकास आघाडी सत्तेत आल्यानंतर किती दिवसात मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण देणार हे त्यांच्याकडून लिहून घ्या.

मनोज दादा यापूर्वी मराठा–मुस्लिम वाद, मराठा–दलित वाद आणि आता मराठा ओबीसी वाद सुरू आहे. त्यामुळे आणखी किती जातींशी वैमनस्य घ्यायचे ते सांगा. देवेंद्र फडणवीस यांना हटवताना मराठा असलेले मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सरकार पाडून आपण ब्राह्मण असलेल्या उद्धव ठाकरेंना मुख्यमंत्रीपदी बसवून मराठा समाजावर अन्याय करणार नाही का? असे प्रश्न अण्णासाहेब शिंदें यांनी उपस्थित केले आहेत.

# मृदा आणि जलसंधारणातून मेळघाटचा होणार विकास?

## नाशिक प्रबोधिनीचे अधिकारी सादर करणार अहवाल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४ मेळघाट**

सातपुडा पर्वत रांगेत वसलेल्या मेळघाटातील कुपोषण आणि स्थलांतराच्या विविध समस्यांवर त्या भागातील मृद आणि जलसंधारणाच्या माध्यमातून मात करता येईल का? या संदर्भात विभागीय प्रशिक्षण संस्था नाशिकमार्फत मृद आणि जलसंधारण अधिकारी वर्ग २ यांचा विशेष दौरा आयोजित करण्यात आला होता. दोन दिवसीय दौऱ्यात मेळघाटातील शेतीची परिस्थिती आणि पद्धती जाणून घेतल्यानंतर या संदर्भातील अहवाल शासनाकडे सादर केला जाणार आहे.





अधिकाऱ्यांनी जाणून घेतल्या मेळघाटातील अडचणी : विभागीय प्रशिक्षण संस्था नाशिक मार्फत मृद व जलसंधारण विभागाचे एकूण ५३ वर्ग २ अधिकारी दोन दिवस मेळघाटात होते. मेळघाटात पावसाळ्यात भरपूर पाऊस पडतो. मात्र, या पावसाचं ७५ टक्के पाणी वाहून जातं. त्यामुळं मेळघाटात मृद व जलसंधारण अत्यंत गरजेचं आहे. शासनाच्या वतीनं नरेगा अंतर्गत मृद व जलसंधारणाची कामं केली जात आहेत. असे असले तरी मेळघाटातील आदिवासी गावातील मृद व जलसंधारणाच्या समस्यांबाबत या अधिकाऱ्यांनी भावई व चिखलदरा येथील ग्रामस्थांशी संवाद साधला.

मृदा आणि जलसंधारणाच्या मेळघाटात अशा आहेत अडचणी : मेळघाटात उंच डोंगरावरून वाहणाऱ्या पाण्याबरोबरच शेतीसाठी उपयुक्त असणारी सुपीक मातीही मोठ्या प्रमाणात वाहून जाते. एका तांत्रिक अधिकाऱ्याकडे तीन ग्रामपंचायतींची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. तीन ग्रामपंचायती अंतर्गत एकूण दहा गावांमध्ये सुरू असलेली कामं तांत्रिकदृष्ट्या योग्य असतील, असं होत नाही. यातून योजना राबवणे आणि गावकऱ्यांना मजुरी मिळवून देणे एवढेच काम होतं. मात्र, मृद व जलसंधारणाचे महत्त्वाचं उद्दिष्ट सर्वच ठिकाणी यशस्वी होत नसल्याचं अधिकाऱ्यांच्या लक्षात आलं.

असे केले जातात प्रयत्न : माती आणि जलसंधारणाचे नियोजन वरपासून खालपर्यंत केले जाते. डोंगराच्या उंच भागावर 'चर' खोदून मधल्या भागात दगडी बांध तयार केला जातो. त्यामुळे पाणी अडवण्यास मदत होऊन भूजल पातळी वाढते. त्यामुळंच या भागातील शेतकरी हे आडव्या पद्धतीनं पीक पेरणी करतात. ही पीक पेरणी ही मृदा आणि जलसंधारणासाठी अतिशय उपयुक्त आहे. आदिवासी बांधवांच्या या पारंपारीक शेती पद्धतीचा अभ्यास करण्यासाठी मृद आणि जलसंधारण विभागाच्या अधिकाऱ्यांनी मेळघाटाचा दौरा केला.

पिण्याच्या पाण्याची समस्या : मेळघाटात भरपूर पाऊस पडत असला तरी या ठिकाणी पाणी साठवण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आलेले नाहीत. गंभीर बाब म्हणजे मेळघाटात पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर आहे. दुर्गम भागात असलेल्या अनेक गावांमध्ये पावसाळ्यातही पिण्याच्या पाण्यासाठी पायपीट करावी लागत असल्याची परिस्थिती आहे. या दौऱ्यात अधिकाऱ्यांनी पिण्याच्या पाण्याच्या समस्येचीही दखल घेतली.

शासनाला प्रकल्प करणार सादर : मृद आणि जलसंधारण विभागाचे हे प्रशिक्षण अधिकारी गावपातळीवरील समस्या समजून घेण्यासाठी दोन दिवसीय अभ्यास दौऱ्यासाठी मेळघाटात आले होते. अधिकारी स्वत: तळागाळात जाऊन मृदणी जलसंधारण संदर्भातील समस्या जाणून घेतल्या आहेत. या समस्यांवर नेमकं कसं काम करायचं, या उद्देशानं या अधिकाऱ्यांनी दोन दिवस मेळघाटातील जलसंधारणाच्या विकासकामांचं निरीक्षण केलं. या अभ्यास दौऱ्या संदर्भात प्रशिक्षण अधिकारी जो काही प्रकल्प अहवाल तयार करतील, तो शासनाला सादर केला जाईल, असं मंत्रालयातील उपसचिव तथा नाशिक प्रबोधिनीच्या संचालक जयरेखा निकुंभ यांनी सांगितले

# आवडीच्या नंबरसाठी आता मोजावे लागणार दुप्पट पैसे; फॅन्सी नंबरची किंमत चौपट

## ०००१ नंबर ६ लाखांचा; दुचाकीच्या किमतीएवढी फॅन्सी नंबरची किंमत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४नागपूर –** आपल्या वाहनाच्या नंबरप्लेटकडे इतरांचे लक्ष वेधून घेण्याचा बऱ्याच जणांचा कल असतो. लक्ष वेधून घेणारा 'फॅन्सी नंबर जेवढा आकर्षक तेवढी पत मोठी, असा अनेकांचा समज असतो. या आकर्षक नंबरांची 'क्रेझ' पाहता पुन्हा एकदा परिवहन विभागाने आवडीच्या नंबरच्या शुल्कात दुप्पट वाढ केली. यामुळे शौकिनांच्या खिशाला अधिकची कात्री लागणार आहे.

वाहनांना आकर्षक नंबर देण्याचे 'फेड' नवे नाही. गाडीला ठराविक नंबर मिळावा, यासाठी आग्रही असणाऱ्यांची संख्या मोठी आहे. ही बाब प्रादेशिक परिवहन विभागाने आपल्या पथ्यावर पाडून घेत २०१३ मध्ये 'फैन्सी' नंबरच्या शुल्कात तीन ते चार पट वाढ केली. जो 'एक' नंबर एक लाख रुपयांचा होता तो मोठ्या शहरात चार लाखांचा तर छोट्या शहरात तीन लाखांचा केला. आकर्षक नंबर महागल्याने वाहनधारक याकडे पाठ फिरवतील असा काहींचा समज होता. मात्र, २०२२–२३ मध्ये या 'फॅन्सी' नंबरमधून एकट्या ग्रामीण आरटीओला तब्बल ४ कोटी ३१ लाख ५६ हजार ५०० रुपयांचा महसूल मिळाला. हौसेला मोल नसल्याचे यातून दिसून आले. आता पुन्हा ३० ऑगस्टपासून 'फॅन्सी' नंबरचे दर वाढविण्यात आल्याची अधिसूचना गृह विभागाने काढली.

मालिकेतील शेवटच्या क्रमांकापासून १ हजार पेक्षा अधिक असलेल्या कोणत्याही क्रमांकासाठी पूर्वी अतिरिक्त शुल्क ७ हजार ५०० रुपये आकारले जायचे. आता त्याची किंमत वाढवून १५ हजार रुपये करण्यात आली.कारसोबतच दुचाकी वाहनांच्या 'फॅन्सी' नंबरमध्ये भरमसाठ वाढ झाली आहे. पूर्वी दुचाकीसाठी ०००१ नंबर हा ५० हजारांचा होता आता या नंबरसाठी एक लाख रुपये मोजावे लागणार आहे. दुचाकी एवढीच फॅन्सी नंबरची जवळपास किंमत झाल्याने या नंबरला ग्राहक मिळतात की नाही, याकडे आरटीओचेही





लक्ष लागले आहे.परिवहन विभागाने २०१३ मध्ये व्हीआयपी नंबरच्या शुल्कात वाढ करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार नागपूर, मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड, पुणे, संभाजीनगर, कोल्हापूर, नाशिक या जिल्ह्यांमध्ये चारचाकी वाहनांसाठी ०००१ हा नंबर चार लाखांचा तर, इतर जिल्ह्यांमध्ये याच नंबरला तीन लाख रुपये शुल्क केले. आता पुन्हा या नंबरसाठी या नऊ जिल्ह्यांमध्ये हाच नंबर सहा लाखांचा तर इतर जिल्ह्यासाठी हा नंबर पाच लाखांचा करण्यात आला आहे.

# स्टेनलेस स्टील वापरलं असतं तर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा पडला नसता :- नितीन गडकरी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४ नवी दिल्ली:**
सिंधुदुर्गातील राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा तयार करताना त्यामध्ये स्टेनलेस स्टीलचा वापर झाला असता तर तो पुतळा पडला नसता, असे मत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केले. समुद्रकिनाऱ्याच्या परिसरात कोणतेही बांधकाम करताना त्यामध्ये स्टेनलेस स्टीलचा वापर होणे गरजेचे आहे. कारण स्टेनलेस स्टीलला गंज लागत नाही, असे नितीन गडकरी यांनी सांगितले. ते मंगळवारी दिल्लीतील एका कार्यक्रमात बोलत होते.

समुद्रकिनाऱ्याच्या परिसरात बांधण्यात येणाऱ्या उड्डाणपूलांसाठी स्टेनलेस स्टीलचा वापर करण्यात यावा, यासाठी मी गेल्या तीन वर्षांपासून सातत्याने प्रयत्न करत आहे. मी मुंबईत जेव्हा ५५ उड्डाणपूल बांधले तेव्हा मी एका माणसासोबत फेरफटका मारत होतो. तेव्हा त्याने मला उड्डाणपूलासाठी वापरल्या जाणाऱ्या लोखंडावर पावडर कोटिंग वापरण्यात आल्याचे दाखवले होते. या पावडर कोटिंगमुळे लोखंड गंजणार नाही, असा दावा त्याने केला होता. मात्र, नंतरच्या काळात मुंबईतील उड्डाणपूलांसाठी वापरण्यात आलेल्या लोखंडाला गंज लागला.

त्यामुळे आता मला असे वाटते की, समुद्रकिनाऱ्यापासून ३० किलोमीटर अंतरावर असलेल्या भागात रस्त्यांचे बांधकाम करताना स्टेनलेस स्टीलचाच वापर करण्यात यावा. राजकोट किल्ल्यावरील शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची उभारणी करतानाही स्टेनलेस स्टील वापरले असते तर हा पुतळा पडला नसता, असे नितीन गडकरी यांनी म्हटले.

भारतीय नौदलामार्फत राजकोट किल्ल्यावर शिवाजी महाराजांच्या २८ फुटी ब्राँझच्या पुतळ्याची उभारणी करण्यात आली होती. हा पुतळा जयदीप आपटे या शिल्पकाराने उभारला होता. या पुतळ्याच्या जोडणीसाठी वापरण्यात आलेले नटबोल्ट गंजल्याची माहिती समोर आली होती. याबाबत सार्वजनिक विभागाने नौदल विभागाला कळवले होते. परंतु, नौदलाकडून त्यानंतर कोणतीही पावले उचलण्यात आली नाहीत. शिवाजी महाराजांचा हा पुतळा तयार करण्यासाठी तब्बल २ कोटी ४४ लाख रुपयांचा खर्च झाला होता. पंतप्रधान मोदी यांनी या पुतळ्याचे अनावरण केले होते. मात्र, आठ महिन्यांमध्ये हा पुतळा पडल्याने महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली होती.

### जयदीप आपटे विरोधात लूकआऊट नोटीस जारी

दरम्यान, या प्रकरणात स्ट्रक्चरल कन्सल्टंट चेतन पाटील आणि शिल्पकार जयदीप आपटे यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. यापैकी चेतन पाटील यांना पोलिसांना अटक केली आहे. मात्र, जयदीप आपटे अद्याप फरार आहे. पोलिसांनी त्याला शोधण्यासाठी पाच पथके तैनात केली असून त्याच्याविरुद्ध लूकआऊट नोटीसही जारी करण्यात आली आहे.

# मातीचे घर कोसळल्याने एक वृद्धाचा मृत्यू

### चांदूर रेल्वे शहरातील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४ चांदूर रेल्वे –** अमरावती जिल्ह्यातील चांदूर रेल्वे शहरातील डांगरीपुरा परिसरातील टीन मातीचे घर *सततच्या पावसामुळे* अचानक कोसळल्याची घटना आज मंगळवारी सायंकाळी ७.४५ वाजताच्या दरम्यान घडली. भिंतीच्या मलब्या खाली दबून शेख तुराब शेख पठाण (वय ७५) हे गंभीर जखमी झाले असुन त्यांना जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती येथे रेफर करण्यात आले तर घरातील इतर सदस्य सुदैवाने बचावले. घटनेची माहिती मिळताच चांदूर रेल्वेचे तलाठी यांनी पंचनामा केला असून पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली आहे.सदर व्यक्तीचा उपचारा दरम्यान जिल्हा सामान्य रुग्णालयात मृत्यू झाला



# दिवाळीनंतर वाढोण्याच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील चिमुकल्यांना मिळणार जर्मन भाषेच ज्ञान



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४ अचलपूर**

उच्च माध्यमिक शिक्षणाचं व्यावसायीकरण या योजनेचा विस्तार करुन युरोपच्या जर्मन राष्ट्रात बाडेन वूटेनबर्ग या राज्यासोबत महाराष्ट्र शासनानं सामंजस्य करार केला आहे. या करारांतर्गत महाराष्ट्रातील हजारो तरुणांना जर्मनीत रोजगार मिळणार असून यासाठी त्यांना जर्मन भाषा देखील शिकावी लागणार आहे. जर्मन भाषा राज्यात रुळावी, विकसित व्हावी या उद्देशानं राज्य शासनाच्या वतीनं आता विशेष प्रयत्न सुरू झाले आहेत. अमरावती जिल्ह्यातील अचलपूर तालुक्यात येणाऱ्या वाढोणा या अवघ्या तीनशे ते साडेतीनशे लोकवस्तीच्या गावात असणाऱ्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील चिमुकल्यांना देखील जर्मन भाषा शिकण्याचे वेध लागलेत. या शाळेच्या शिक्षिका जर्मन भाषेचं प्रशिक्षण घेणार असल्यानं दिवाळीनंतर आपल्याला देखील जर्मन भाषेचं ज्ञान मिळेल, याची उत्सुकता विद्यार्थ्यांना आहे.

वाढोणा इथल्या जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील इयत्ता पहिली ते पाचवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना गत दोन वर्षांपासून शाळेतील शिक्षिका सुनिता लहाने ढोक या प्राथमिक स्तरावरील जपानी भाषेचं ज्ञान देत आहेत. जपानी बाराखडी देखील हे चिमुकले गिरवायला लागले असून प्राथमिक स्तरावरील जपानी भाषा देखील हे विद्यार्थी बोलायला शिकलेत. शालेय अभ्यासक्रमात उपक्रम नसला, तरी या शाळेतील इयत्ता पहिली ते पाचवीपर्यंतचे विद्यार्थी जपानी भाषेसाठी स्वतंत्र वहीमध्ये जपानी लिपी आणि शब्द गिरवत आहेत. नवीन शैक्षणिक धोरण २०२० नुसार परकीय भाषा शिकण्यास प्राधान्य देण्यात आलं. त्या अंतर्गतच आम्ही शाळेत जपानी भाषा शिकवण्यास सुरुवात केली. जपानी भाषा हे विद्यार्थी शिकू शकतात. त्यामुळं जर्मन भाषा शिकणं देखील या विद्यार्थ्यांना सहज जमेल, असा विश्वास सुनिता लहाने ढोक यांनी व्यक्त केला.

# लाडक्या बहिणींच्या ओवाळणीवर बँकांचा डल्ला

### लाभार्थ्यांची महिला व बालविकास मंत्र्यांकडे तक्रार

**विदर्भ प्रजासत्ताक**



**दि.४ पुणे–** 'लाडकी बहीण' योजनेचे पैसे सरकारने बँकेच्या खात्यात जमा केले. 'बँकांच्या खात्यातून कोणत्याही कारणास्तव पैसे कापू नका,' अशी तंबी देऊनही बँकांकडून आडमुठेपणा सुरूच आहे. बँकेचे खाते 'होल्ड' करण्यात आल्याचे कारण सांगून 'थकीत रक्कम भरा, नंतर योजनेचे पैसे मिळतील,' असे सांगून बहिणींच्या 'ओवाळणी'वर बँकांचा 'डल्ला' सुरू असल्याचे प्रकार समोर आले आहेत.

या संदर्भात महिला व बालविकासमंत्री अदिती तटकरे यांच्याकडे निकिता आदित्य हेंद्रे यांनी लेखी तक्रार केली आहे. हेंद्रे यांना या संदर्भात एका बँकेच्या शाखेत विचित्र अनुभव आला. तसाच अनुभव आणखी एका लाभार्थी महिलेस आल्याचे आढळले. 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेंतर्गत जुलै–ऑगस्ट या महिन्यांच्या तीन हजार रुपयांची रक्कम लाभार्थ्यांच्या खात्यात जमा झाली आहे. मात्र, लाभार्थ्यांच्या खात्यात रक्कम जमा होताच अनेकांना काढता येईनाशी झाली. कमीत कमी रक्कम खात्यात शिल्लक असावी, या अटीचे पालन करण्यासाठी 'लाडकी बहीण' योजनेतून मिळालेल्या रकमेतून बँकेने रक्कम कापायला सुरुवात केली. काहींनी दंडात्मक स्वरूपाची रक्कम, तर काही बँकांनी थकीत कर्जाचे हप्ते म्हणून रक्कम वसूल केली आहे. या तक्रारींची दखल घेऊन महिला व बालविकास विभागाचे सचिव डॉ. अनुपकुमार यादव यांनी बँकांना कोणत्याही कारणास्तव रकमा कापू नका, अशा शब्दांत तंबी देणारे पत्र यापूर्वीच पाठवून सूचना दिल्या होत्या. मात्र, या तक्रारीवरून पुन्हा सरकारच्या आदेशाला केराची टोपली दाखविल्याचे स्पष्ट होत आहे.

# तळेगाव ठाकुर मध्ये भव्य तान्हा पोळ्याचे आयोजन

### तान्हा पोळ्या मध्ये सभापती तथा इतर मान्यवरांची उपस्थिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४ तळेगाव ठाकूर**



तिवसा तालुक्यातील तळेगाव ठाकुर मध्ये छत्रपती शिवाजी महाराज मंडळ व स्व.विजय मते यांच्या स्मुर्तीपित्यर्थ भव्य तान्हा पोळ्याचे आयोजन मंगळवारी सायंकाळी ५ वाजता आयोजन करण्यात आले.कित्येक वर्षा पासून तान्हा पोळा साजरा करण्यात येतो.या तान्हा पोळ्यात मातीचे बैल बनवून सुंदर वेशभुषा परिधान करून सामाजिक संदेश देण्यात आले होते.

यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांचे पूजन करून तान्हा पोळ्या ची सुरवात करण्यात आली.या तान्हा पोळ्यात खास वैशिष्ट्ये महादेवाचे गाणे आणि गुढी परंपरा आहे.तान्हा पोळ्यात आणलेल्या नंदी बैलाचे निरीक्षण करण्यात आले.यावेळी हरिभाऊ मते यांच्या अध्यक्षेखाली तथा सौ.कल्पनाताई दिवे (सभापती),सतीश पारधी (ता.ल.का अध्यक्ष,काँग्रेस),मंगेश राऊत(ग्रामपंचायत सदस्य) इतर मान्यवरच्या उपस्थिती मध्ये बैलाची निवड करण्यात आली.

या तान्हा पोळ्यात ९० चिमुकल्याणी सहभाग घेतला होता.या तान्हा पोळ्यात प्रथम क्र.अंशू बंडू मारबदे,द्वितीय क्र.पियुष संजय पाटील,तृतीय क्र.चेतन योगेश शेलोकर यांची निवड करून प्रोत्साहन पर बक्षीस देण्यात आले.तान्हा पोळ्यात चिमुकल्याना वही,पेन व चॉकलेट वाटण्यात आले.अशा तान्हा पोळ्यात गावातील पालक,महीला व बालगोपाल फार संख्येत पाहायला मिळाले.

# वणी बेलखेडा येथील तान्हा पोळा ठरला वेधक

### चिमुकल्याचे मनोबल वाढवण्यासाठी एक प्रेरणादायी उपक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४ वणीबेलखेड–** चांदुर बाजार तालुक्यातील वणी बेलखेडा स्व गोपाल बहुउद्देशीय संस्था यांच्या वतीने लहान मुलाचे मनोबल वाढवण्यासाठी एक प्रेरणादायी तान्हा पोळा उत्सव उपक्रम साजरा करण्यात आला या उत्सवामध्ये गावातील १५०विद्यार्थीनी सहभाग घेऊन उत्कृट शेतकरी वेशभूषा करून कार्यक्रमात सहभाग नोंदवला या उपक्रमाला पाहण्यासाठी गावातील नागरीकांनी मोठ्या संख्येने उपस्थित दर्शवून आपल्या मुलाचे कौतुक पाहण्यासाठी कार्यक्रमाची शोभा वाढवली. या कार्यक्रमात लहान चिमुकल्यांनी आपल्या कलाकृती ने तयार केलेली वेशभूषा तान्हा पोळा बैल जोडी दाखवून उपस्थित होते. या कार्यक्रमाला पाहण्यासाठी कार्यक्रम उठवा देण्यासाठी कार्यक्रमाचे अध्यक्ष महणून सुयोग गोरले युवा पत्रकार म्हणून उपस्थित होते तर प्रमुख अतिथी म्हणून पत्रकार श्री घनश्याम पालीवाल, ब्राह्मणवाडा पोलीस स्टेशनचे झडख श्री राजसाहेब सरपंच सौ अनुपमाताई ठाकरे, उपसरपंच श्री अशोकराव अलोने, प्रहार शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्री मंगेश देशमुख ,सेवा सहकारी सोसायटीचे अध्यक्ष किशोरकोठाळे,प्रफुलनवघरे ,गावचे माजी उपसरपंच श्रीरामजी कोठाळे, अतुलठाकरे तंटामुक्ती अध्यक्ष, अरुण धाकडे , राजूभाऊ काळे पोलीस पाटील, सुनील अलोणे, बेलखेडा येथील पोलीस पाटील अमर ठाकरे ,आधी मान्यवर उपस्थित होते.या तान्हा पोळा मध्ये शेतकऱ्याची भूमिका व वेशभूषा करणाऱ्या मुलांना गावकऱ्यांतर्फे बक्षीस वितरित करण्यात आले त्यावेळी गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# संकटग्रस्त बालकांच्या मदतीसाठी १०९८ हेल्पलाईन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४अकोला,** संकटात सापडलेल्या मुलांच्या मदतीसाठी १०९८ ही चाईल्ड हेल्पलाईन सर्व दिवस चोवीस तास सुरू आहे. कुठेही बालक संकटात असल्याचे जाणवताच नागरिकांनी हेल्पलाईनचा वापर करून त्याला मदत करावी, असे आवाहन महिला व बालविकास आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे यांनी केले आहे.

CHILD LINE 1098 NIGHT & DAY

कोणत्याही प्रकारच्या अडचणीत, संकटात सापडलेल्या तसेच काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या शून्य ते अठरा वयोगटातील सर्व बालकांच्या त्वरित मदतीकरिता केंद्र व राज्याच्या महिला व बाल विकास विभागामार्फत चाईल्ड हेल्पलाईन सेवा १०९८ हा क्रमांक संपूर्ण महाराष्ट्रात कार्यान्वित आहे.

या सेवेअंतर्गत संकटग्रस्त बालकांना २४७ हेल्पलाईन सेवा उपलब्ध आहे. या सेवेचा लाभ बालक स्वतः घेवू शकते किंवा इतर कोणीही या सेवेद्वारे बालकाला मदत मिळवून देऊ शकतात.

१०९८ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधून संकटग्रस्त बालकांना मदत करावी, असे आवाहन महिला व बालविकास आयुक्त डॉ. नारनवरे यांनी केले आहे.

# आपदग्रस्तांना तातडीने मदत उपलब्ध करून देण्यात यावी

## मुख्यमंत्र्यांच्या विभागीय, जिल्हा प्रशासनाला सूचना

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.४मुंबई,** विशेषतः मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसामुळे मोठे नुकसान झाले आहे. यासह मुसळधार पावसामुळे नुकसान झालेल्या विदर्भासह इतर भागातील जिल्हे किंवा तालुक्यांमध्ये पंचनामे आणि मदतीची कार्यवाही त्वरित करण्यात यावी, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत.

पिकांचे झालेले नुकसान, घरांची पडझड, पशुधनाची हानी अशा सर्व बाबींची माहिती घेण्यात यावी, त्वरित पंचनामे करण्यात यावेत. अतिवृष्टीमुळे तात्पुरते स्थलांतर केलेल्या लोकांना सर्व आवश्यक सुविधा देण्यात याव्यात. त्यांना आवश्यक ती सर्व मदत त्वरित उपलब्ध करून द्यावी, अशा सूचना दिल्या आहेत.विभागीय आयुक्त, जिल्हा प्रशासन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, स्थानिक नगरपालिका, महानगरपालिका, ग्रामपंचायती, पोलीस प्रशासन आदी सर्वांनी समन्वयाने यासाठी कामकाज करावे, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत.




आपत्ती व्यवस्थापन कक्ष २४ तास खुला ठेवावा, याद्वारे मदत आणि पुनर्वसनाचे सनियंत्रण करावे, स्थलांतर केलेल्या लोकांसाठी चांगल्या दर्जाचे तात्पुरते निवारे उभे करावेत, त्यांना कपडे, अन्न शुद्ध पाणी, औषधे इत्यादी जीवनावश्यक वस्तूंचा ताबडतोब पुरवठा करण्यात यावा, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी प्रशासनाला दिले आहेत.

पाटबंधारे विभाग, हवामान खाते यांच्याशी समन्वय ठेवून लोकांना आवश्यक माहिती त्वरित द्यावी. आपतग्रस्त लोकांच्या मदतीसाठी आपत्कालीन हेल्पलाइन आणि कंट्रोल रूम त्वरित कार्यरत करावी. विद्यार्थ्यांची सुरक्षितता लक्षात घेता शाळा आणि महाविद्यालयांसंदर्भात स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन जिल्हा प्रशासनाने निर्णय घ्यावेत. त्याचबरोबर पाऊस परिस्थिती, बाधित क्षेत्र, धरणांमधील पाणी पातळी, स्थलांतरित लोकांची संख्या, झालेल्या नुकसानीची माहिती इत्यादी माहिती त्वरित वेळोवेळी सादर करावी, अशा सूचनाही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी दिल्या आहेत.

# श्रींच्या आगमनाची चाहूल, बाजारातील दुकाने सजली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

सर्वांच्या लाडक्या बाप्पाच्या आगमनाला केवळ चार दिवस उरले आहेत. घरोघरीस्थापनेची लगबग सुरू झाली आहे. शनिवारी होत असलेल्या गणेशस्थापनेचा उत्साह बाजारातही संचारला आहे. सजावटीपासून तर वस्त्रालंकाराची दुकाने सजल्याने बाजारपेठांमध्ये नवे चैतन्य निर्माण झाले आहे.





गणेशमूर्तीसाठी बाजारात सध्या सर्वात जास्त लगबग दिसून येत आहे. गणेशमंडळांच्या मूर्तीची रंगरंगोटी शेवटच्या टप्प्यात असून घरगुती मूर्ती मोठ्या प्रमाणात विक्रीस उपलब्ध झाल्या आहेत. पेट्रोलचे दर वाढल्याने त्याचा परिणाम गणेशमूर्तीसह इतरही साहित्यांवर झाला आहे. असे असले तरी गणेशासोबतच तिसऱ्या दिवशी गौरीचेही आगमन होत असल्याने गणेशोत्सवात कोट्यवधींची उलाढाल अपेक्षित आहे.

गणेशोत्सवासाठी सजावटीचे अनेक पर्याय उपलब्ध झाले आहेत. रेडिमेड फुलांचे व धाग्यांच्या मखरांना सर्वाधिक मागणी आहे. ९०० रुपयांपासून तर ५ हजारांपर्यंतचे मखर बाजारात उपलब्ध आहेत. सनफ्लॉवर, ब्लॉसम, ऑर्गेन्झा, ऑर्चिड, लीफस्टिक आदी प्लॅस्टिक फुलांसह विविधरंगी ओढण्याचा उपयोग करून तयार होणारे हे मखर उघडून ठेवता येत असल्याने वापरणे सोयीचे जाते.

## पूजा साहित्यांनी दुकाने सजली

गणेशोत्सवापासून पुढे गौरी, नवरात्री हे सण सलग येत आहेत. या पूर्ण काळात साध्या वाती, फुलवाती, अगरबत्ती, कापूर, नारळ, विड्याची पाने, सुपारी, ओटीचे साहित्य अशा विविध वस्तूंची मागणी वाढते. त्यामुळे या साहित्यांची दुकाने सजली असून त्यांचे भावही चढे असल्याचे दिसून येत आहे.

गणेशोत्सवात सजावटीमध्ये विविधरंगी प्रकाशमाळांची मोठी मागणी असते. बाजारात २० रुपयांपासून तर ५०० रुपयांच्या सिरीज उपलब्ध आहे. सोबतच चेहऱ्यावर थेट प्रकाश सोडणारे एलईडी लाईट, गोल फिरणारे विविधरंगी लाईटची मागणी होत असल्याचे विक्रेते सांगतात.गणेशमूर्तीत नवीन काय याचाही शोध अनेक जण घेत असतात. चितारओळीत विविधरंगी सोवळे, फेटा, पगडी, शेला परिधान केलेल्या श्रींच्या आकर्षक मूर्ती सध्या सर्वांचे लक्ष्य वेधून घेत आहेत. या मूर्तीची सुरुवातच ३ हजारांवर असून १० ते १५ हजारांपर्यंत सजावट केलेल्या मूर्ती विक्रीस उपलब्ध असल्याचे विक्रेते सांगतात.

## सकाळी ११.०३ ते दुपारी १.३४ पर्यंत शुभ मुहूर्त

हिंदू पंचागानुसार गणेश चतुर्थीचा शुभ मुहूर्त हा २ तास ३१ मिनिटांचा असणार आहे. परंतु हा संपूर्ण दिवस चांगला असल्याने गणेश स्थापना कधीही करता येऊ शकते. गणेश चतुर्थी ही शनिवारी ७ सप्टेंबरला दुपारी ३ वाजून १ मिनिटांनी सुरू होईल आणि रविवारी ८ सप्टेंबर संध्याकाळी ५ वाजून ३७ मिनिटांनी समाप्ती होईल. गणेशमूर्ती स्थापन करण्यासाठी सकाळी ११ वाजून ३ मिनिटांपासून ते १ वाजून ३४ मिनिटांपर्यंत शुभ मुहूर्त असेल.

# पाणंद रस्त्यांवर चिखल; शेतकरी त्रस्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४ दर्यापूर**

मुसळधार पावसामुळे पांदण रस्ते चिखलमय झाल्याने दर्यापूर तालुक्यातील शेतकऱ्यांची प्रचंड गैरसोय होत आहे. किमान या पाणंद रस्त्यांवर मुरूम तरी टाकण्यात यावा, अशी मागणी आता शेतकरी करत आहे.

शेतकऱ्यांना नेहमीच या ना त्या कारणामुळे विविध संकटांचा सामना करावा लागतो. गेल्या वर्षी खरीप हंगामात वेळेवर पाऊस न झाल्याने शेतकजयांना अपेक्षीत उत्पादन घेता आले नाही. त्यानंतरही रब्बी हंगामात अवकाळी पाऊस, गारपिट यामुळे पिकांचे अतोनात नुकसान झाले..पावसाळ्यात शेतात जाताना किमान मजबूत पाणंद रस्ते असावे,



अशी अपेक्षा शेतकरी बाळगून आहेत. मात्र, शेतकजयांची ही अपेक्षा या पावसाळ्यातही पूर्ण झाली नाही. तालुक्यातील २० ते २५ गावातील पाणंद रस्त्यांवर चिखल असल्याने शेतात जाताना शेतकजयांची कसरत होत आहे. पेरणीच्या हंगामात शेतात जाताना शेतकजयांची चांगलीच गैरसोय झाली. आताही शेती मशागतीच्या कामासाठी जाताना शेतकजयांना गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. चिखलमय असलेल्या पाणंद रस्त्यांवर किमान मुरूम तरी टाकावा, अशी मागणी शेतकजयांनी केली असली त्यांच्या या मागणीकडे राजकीय नेते लक्ष देतील का?असा प्रश्न आता उपस्थित झाला आहे

# गौरी-गणपतीला गावाकडे जाताय; तर ही काळजी घ्या? आपल्या किमती ऐवज सुरक्षितरीत्या ठेवा : पोलिसांना माहिती देणे गरजेचे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४ अमरावती**

गणपती बाप्पांसाठी अनेकांची गावी जाण्याची लगबग वाढली आहे. अशावेळी बंद घरे चोरट्यांच्या टार्गेटवर असतात.त्यामुळे बाहेर जाताना आपला किमती ऐवज सुरक्षितरीत्या ठेवून घराबाहेर पडण्याचे आवाहन वेळोवेळी पोलिसांकडून करण्यात येत आहे.



जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात गुन्हेगारीत वाढ झाली आहे. त्यातही चोरीच्या घटना दररोज घडत असून, यामुळे जिल्हावासी चांगलेच धास्तावले आहेत. घर बंद करून बाहेर जाणे म्हणजे चोरट्यांना आयते निमंत्रण देणे असा प्रकार झाला आहे.

विशेष म्हणजे, बंद घरावर चोरट्यांची बारीक नजर असून, अशा घरांची त्यांना जास्त गरज असते. अशा घरातच सर्वाधिक चोऱ्या होत असल्याचे दिसत आहे.त्यामुळे बाहेरगावी जात असताना शेजाऱ्यांना व पोलिसांना माहिती देणे गरजेचे आहे.

**तातडीच्या मदतीसाठी ११२ वर कॉल करा**

नागरिकांना कोणताही त्रास झाल्यास त्यांना १० मिनिटांच्या आत मदत मिळावी यासाठी पोलिसांनी ११२ क्रमांक सुरू केला आहे. यामुळे कुणालाही काहीही धोका वाटल्यास लगेच ११२ वर कॉल करावा.असे आवाहन अमरावती पोलिस प्रशासनच्या वतीने करण्यात आले आहे.

# सततच्या पावसाने पिकांचे नुकसान; पंचनामे केव्हा?

## यापूर्वी शासन मदत, यंदा मात्र पडला विसर, शेतकऱ्यांमध्ये नाराजी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

दोन महिन्यांपासून सतत सुरू असलेल्या पावसाने पिकांचे मोठे नुकसान झालेले आहे. यंत्रणेद्वारा फक्त अतिवृष्टीने बाधित पिकांचे पंचनामे करण्यात आले. यापूर्वी २०२२-२३ च्या खरिपात शासनाने सततच्या पावसाने झालेल्या बाधित पिकांचे पंचनामे करून 'एनडीआरएफ'च्या निकषाने मदत दिली होती. यंदा मात्र शासनाला विसर पडला आहे.

यावर्षी मान्सून वेळेत दाखल झाला, त्यानंतर वाटचाल मंदावली व जूनच्या तिसऱ्या आठवड्यापासून पुन्हा पावसाने दमदार सुरुवात केली ती अजूनही सुरूच आहे. यादरम्यान ३२ महसूल मंडळांत अतिवृष्टी झाली. नदी नाल्यांना पूर आल्याने पिके खरडली गेली. शेतात पाणी साचल्याने पिकांचे नुकसान झाले. या नुकसानीचे पंचनामे महसूल व कृषी यंत्रणेद्वारा करण्यात आले. मात्र, दोन महिन्यांपासून सतत पाऊस असल्याने पिकांची वाढ खुंटली काही भागांत पिके पिवळी पडली. ढगाळ वातावरण, सूर्यप्रकाशाचा अभाव व पाऊस यामुळे पिकांवर कीड व रोगांचा प्रादुर्भाव झालेला आहे. अतिवृष्टी नसली तरी सततच्या पावसाने सर्वच पिकांचे मोठे नुकसान झालेले आहे. त्यामुळे सरासरी उत्पादनात कमी येण्याची शक्यता आहे. या बाधित पिकांसाठी शासनस्तरावरून कोणतेही निर्देश नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजीचा सूर आहे.



### अतिवृष्टीच्या नुकसानीपेक्षा बाधित क्षेत्र जास्त

जून व जुलै महिन्यांत अतिवृष्टीमुळे ३७५ हेक्टरमधील पिकांचे ३३ टक्क्यांवर नुकसान झालेले आहे. यासाठी ३२.२८ लाखांच्या मदतीचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांनी शासनाकडे पाठविला आहे. त्याच्यापेक्षा कितीतरी पटींनी जास्त नुकसान सततच्या पावसाने झालेले आहे. या नुकसानीसाठी शासनाच्या कोणत्याही सूचना नाही. शिवाय या बाधित पिकांना विम्याचा परतावादेखील मिळत नाही.

### सोयाबीन पिवळे, तुरीवर मर

सततच्या पावसामुळे काही भागात सोयाबीनची कायिक वाढ झाली. तर काही भागात वाढ खुंटून पिवळे पडले आहे. अशीच स्थिती कपाशीची आहे. याशिवाय कीड व रोगांचा प्रादुर्भाव पिकांवर झालेला आहे. तुरीवर बुरशीजन्य रोगामुळे 'मर' रोग आलेला आहे. अनेक भागातील तुरी जागेवरच सुकत असल्याने सरासरी उत्पादनात कमी येणार असल्याचे वास्तव आहे.

### जिल्हास्थिती (हेक्टरमध्ये)

खरिपाचे पेरणी क्षेत्र : ६.३५ लाख
सोयाबीनचे क्षेत्र : २.५१ लाख
कपाशीचे क्षेत्र : २.२३ लाख
तुरीचे क्षेत्र : १.१२ लाख

# भव्य तान्हा पोळा सजावट स्पर्धेला प्रचंड प्रतिसाद

## प्रवीण हरमकर यांचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४ अमरावती**


शिवसेनेचे प्रविण हरमकर यांच्या वतीने दरवर्षी प्रमाणे यंदाही भव्य तान्हा पोळा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.भारतीय संस्कृती ही फार वैविध्यपूर्ण नटलेली दिसुन येते येथे प्रत्येक गोष्टीला त्या त्या ठिकाणी काही विषेश महत्त्व प्राप्त झाले आहे या आपल्या संस्कृती मधे अगदी निसर्गा पासून तर पाण्या पर्यंत दगडा पासून तर प्राण्यांन पर्यंत प्रत्येकाला महत्व देऊन त्यांचे वेळोवेळी काही सणांच्या नावाने पुजन केले जाते असाच कृषीप्रधान देशातील शेतकर्यांचा जीवलग मित्र बैलांच्या पुजनाचा सण म्हणजे बैल पोळा याच बैल पोळ्याचे अवचीत्य साधुन व अंबागेटच्या आतील जुन्या अमरावतीच्या कित्येक वर्षाच्या परंपरेचे जतन करीत शिवसेनेचे प्रविण हरमकर यांनी यंदाही भव्य तान्हा पोळा सजावट स्पर्धेचे आयोजन दिनांक ३ सप्टेंबर २०२४ रोजी जुनी कोतवली भाजीबाजार येथे करण्यात आले होते या स्पर्धेचे(१)प्रथम रोख बक्षीस १५०१ रू आराध्य डगवार(२)द्वितीय रोख बक्षीस ११०१रू अव्दीती कावरे(३) तृतीय रोख बक्षीस ७०१रू आराध्य पठाडे यांना देण्यात आलेसोबतच स्पर्धेत भाग घेतेलेल्या स्पर्धकांच्या वेशभूषेचे परिक्षण करून त्यांनाही (१) प्रथम वेदीका लोखंडे(२) द्वितीय स्वरा स्वराज खोब्रागडे(३) तृतीय पारितोषिक वल्लभ नांदुरकरया चिमुकल्यांना देण्यात आले. सोबतच प्रत्येक सहभागी स्पर्धकाला बक्षिस चॉकलेट व खेळणी देऊन त्यांचा उत्साह वाढविण्यात आला.या स्पर्धेचे परिक्षण स्वाती ताई बडगुजर व ज्योती ताई राउत यांनी केले.प्रेक्षकांनाहि लकी ड्रॉ मधे भाग घेण्याची संधी मिळाली(१) प्रथम ड्रॉ सोन्याची नथ मालती ताई बिजवे(२) दुसरा ड्रॉ पैठणी साडी संगीता दोरे(३) तीसरा ड्रॉ डिनर सेट अंकिता माथुर या भाग्यवान विजेत्यांना देण्यात आला.तसेच मुलांसोबत महिलांच्या ही सुप्त गुणांना वाव देण्यासाठी अनेक गेम शो चे आयोजन करण्यात आले असून त्यातही हमखास बक्षीस मिळण्याची संधी या कार्यक्रमतुन दिल्या गेली यामधे (१)सौ.स्वाती तिवारी(२)सौ.चौधरी वहिनी(३)सौ.बांबल ताई अशा प्रकारे ही बक्षिसे दिल्या गेली.भर पावसात देखील मुलांनी व पालकांनी उत्साह कमी न होऊ देता सर्व कार्यक्रमत आनंदाने सहभाग दर्शविला.कार्यक्रमाचे संचालन सौ विशाखा प्रवीण हरमकर यांनी केलेया कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून अमरावती शहराच्या लोकप्रिय आमदारसुलभाताई खोडके जिल्हा संघटक प्रीतीताई बंड सर संपर्क प्रमुख प्रतिभाताई महानगरप्रमुख लक्ष्मी शर्मा शिवसेना संघटक ज्योतीताई अवघड शहर प्रमुख राजश्रीताई जटाळे तसेच खोल्हापुरी गेट पोलीस स्टेशन च्या निरीक्षक स्वातीजी पवार मॅडम तसेच शिवसेना जिल्हाप्रमुख श्यामजी देशमुख तालुकाप्रमुख आशिषजी धर्माळे आशिष दारोकार निलेश जटाळे शहर प्रमुख बडनेरा मिथुन सोळंके सोमेश्वरराव गौड गोविंदजी दायमा प्रमोद वानखडे संदीप मानेकर उमेश केडिया नीरज सेवक शफीबाई शकील नगमा रमेश गुरुमाळे मरोडकर मित्तल गुरुमाळे व परिसरातील समस्त नागरिक उपस्थित होते.



# गुजरात राज्याचे आरोग्य, कुटुंब कल्याण मंत्री तथा भाजपाचे वरिष्ठ नेता ऋषिकेश पटेल यांनी घेतली आ. राणांची भेट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

गुजरात राज्याचे आरोग्य, कुटुंब कल्याण,वैद्यकीय शिक्षण,उच्च व तंत्रशिक्षण,कायदा आणि संसदीय कामकाज मंत्री तथा भाजपा चे वरिष्ठ नेता श्री ऋषिकेश पटेल यांचे आमदार रवी राणा यांच्या निवासस्थानी स्नेहील स्वागत, आमदार रवी राणा यांनी शाल,श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले .



विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने ऋषिकेश पटेल हे सध्या अमरावती जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत त्यांच्या गुप्त बेठका व कार्यकर्त्यांकडून माहिती घेणे सुरु आहे अश्यातच आज आमदार रवी राणा यांच्या निवासस्थानी त्यांनी भेट दिली व अमरावती जिल्ह्यातील राजकीय सामाजिक परिस्थिती विषयी चर्चा करून विविध विधानसभा मतदारसंघाचा आढावा घेतला. सौ नवनीत रवी राणा यांनी आपल्या खासदारकीच्या ५ वर्षाच्या काळात देशपातळीवर जी छाप निर्माण केली त्यामुळे भाजपा चे केंद्रीय नेतृत्व अत्यंत प्रभावित झाले असून लवकरच पक्ष त्यांना योग्य संधी देवून राज्यसभेवर पाठवेल असा विश्वास हि त्यांनी यावेळी व्यक्त केला. आमदार रवी राणा यांच्या बडनेरा मतदार संघातील विकासकामानी आपण प्रभावित झालो असून रवी राणा हे पुन्हा चौथ्या वेळा आमदार होतील याबदल आपल्याला खात्री असल्याचे प्रतिपादन सुद्धा गुजरातचे मंत्री ऋषिकेश पटेल यांनी केले. यावेळी आमदार रवी राणा यांचे समवेत जयंतराव वानखडे,हर्षल रेवणे,किशोर पिवाल,अविनाश तापडिया,राहुल बजाज,निखिल वावगे आदी उपस्थित होते.

# डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय येथे राष्ट्रीय पोषण माहचे उद्घाटन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४ अमरावती**

श्री शिवाजी शिक्षण संस्था द्वारा संचालित डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय येथे ०३ सप्टेंबर पासून राष्ट्रीय पोषण माह कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. भारत सरकारद्वारे राष्ट्रीय पोषण अभियानाची सुरूवात २०१८ साली करण्यात आली होती. त्याअनुषंगाने डॉ. पंजाबराव देशमुख रूग्णालयामध्ये ६ व्या राष्ट्रीय पोषण माहचे उद्घाटन दिनांक ०३ सप्टेंबर २०२४ रोजी अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. रूग्णालयाच्या आहारतज्ञ डॉ. उज्वला ढेवले यांनी प्रदर्शित केलेल्या 'तेल व तूप वापरतांना' या विषयावर आधारित घोष वाक्याच्या प्रदर्शनीचे उद्घाटन करण्यात आले. राष्ट्रीय पोषण माहच्या निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

# भाजपच्या प्रवासी नेत्यांना ढाब्यावर जेवण्यास मनाई, कार्यकर्त्यांच्या घरीच जेवा

## पदाधिकाऱ्यांकडे काहीही न मागण्याच्या सूचना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४मुंबई**

ढाब्यावर जेवण्याचे प्रकरण मध्यंतरी राज्य भाजपमध्ये गाजले. आता विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने सात - आठ राज्यांमधील जे नेते तब्बल दोन - अडीच महिने महाराष्ट्रात राहणार आहेत, त्यांना ढाब्यावर, बड्या हॉटेलांमध्ये जेवण्यास मनाई करण्यात आली आहे. पक्षाच्या कार्यकर्त्यांकडेच जेवण, नाष्टा करा आणि चहाही तिथेच घ्या, असे त्यांना सांगितले.



राज्याच्या विविध भागांमध्ये परराज्यातील बडे नेते, मंत्री, खासदार यांना विधानसभेची निवडणूक संपेपर्यंत मुक्कामी राहण्यास सांगण्यात आले. या प्रवासी नेत्यांची आणि विदर्भातील भाजप पदाधिकाऱ्यांची आठ तासांची बैठक ३१ ऑगस्टला नागपुरात झाली. त्यात ढाब्यावरील जेवणासह विविध सूचना देण्यात आल्या.

**अमरावतीत सुरु आहे गुप्त मोहीम**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचे निकटवर्ती मानले जाणारे गुजरातचे आरोग्य मंत्री ऋषिकेश पटेल हे चार दिवसांपासून अमरावती शहरामध्ये मुक्कामी आहेत. विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सामान्य कार्यकर्ते, सामान्य माणसांना गावोगावी जाऊन ते त्यांच्या भावना जाणून घेत वर रिपोर्टिंग करत असल्याची माहिती आहे, असे बरेच नेते प्रसिद्धी माध्यमांना माहिती होऊ न देता गुप्त मोहिमेवर राज्यात फिरत आहेत.नोव्हेंबरच्या तिसऱ्या आठवड्यात निवडणूक होईल, असा अंदाज आहे. एक - दोन राज्यांच्या बड्या नेत्यांना एकेक विभाग (जसे विदर्भ, मराठवाडा) वाटून देण्यात आले.

याशिवाय एकेका नेत्याला जिल्हा, विधानसभानिहायदेखील जबाबदारी देण्यात आली आहे. १९८० पासून भाजपचे किंवा त्याही आधी जनसंघाचे कोण कोण नेते आहेत, त्यांना भेटा, विश्वासात घ्या आणि सक्रिय करा, असे त्यांना सांगण्यात आले आहे.

**२२ कलमी कार्यक्रम**

हे जे प्रवासी नेते आहेत, त्यांनी काय काय करायचे, याची २२ कलमे असणारी यादीच त्यांनी दिली आहे.

पक्ष कार्यालय, कार्यकर्ते सक्रिय करा, बूथ पातळीपासून कार्यकर्त्यांच्या बैठका घ्या, पक्षामध्ये अंतर्गत मतभेद असतील तर ते मिटवा, पक्षाच्या विविध आघाड्यांना सक्रिय करा, स्थानिक स्वराज्य संस्था, राज्य व केंद्र सरकारच्या विविध योजनांच्या लाभार्थींशी संपर्क करण्याची यंत्रणा उभारा आदी कार्यक्रम त्यांना देण्यात आले आहेत.

## शरद पवारांच्या भूमिकेचं काँग्रेसकडून समर्थन; उद्धव ठाकरेंची मागणी अमान्यच




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४ मुंबई**

विधानसभा निवडणुकीपूर्वी महाविकास आघाडीचा मुख्यमंत्रिपदाचा चेहरा ठरवावा. हवं तर मी त्याला पाठिंबा द्यायलाही तयार आहे अशी मागणी उद्धव ठाकरेंकडून सातत्याने होत आहे. मात्र या मागणीवर शरद पवारांनी स्पष्ट भूमिका मांडल्यानंतर आता काँग्रेसकडूनही त्याचे समर्थन करण्यात आले आहे.

शरद पवारांच्या विधानावर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटलं की, शरद पवार चुकीचे काय बोलले, महाविकास आघाडी म्हणूनच आम्ही निवडणुकीला पुढे जाणार आहोत. महाविकास आघाडीचं संख्याबळ आल्यानंतरच तिथे मुख्यमंत्रिपदाचा चेहरा ठरवला जाईल. मविआच्या मेळाव्यात आम्ही उद्धव ठाकरेंच्या मागणीवर बोललोय. महाविकास आघाडी म्हणूनच आम्ही निवडणुकीला सामोरे जाऊ असं त्यांनी सांगितले. तर कुणीही मुख्यमंत्रिपदासाठी लढत नाही. जे महाराष्ट्रद्वेष्टे भाजपा आहेत त्यांना आम्हाला सत्तेतून दूर करायचं आहे. मुख्यमंत्रिपदाबाबत आम्ही चर्चा करत राहू.

## लाडकी बहीणनंतर आता मुलींसाठी 'लेक लाडकी' योजना; मिळणार तब्बल १ लाखांची मदत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

राज्य सरकारने महिलांसाठी लाडकी बहीण योजना राबवली आहे. या योजनेअंतर्गत २१ ते ६५ वयोगटातील महिलांना दर महिन्याला १५०० रुपये मिळतात. परंतु याच योजनेसोबत मुलींसाठीही एक योजना राबवण्यात आली आहे. महाराष्ट्र सरकारची लेक लाडकी ही योजना मुलींना आर्थिक मदत करण्यासाठी राबवण्यात आली आहे. लेक लाडकी योजना नक्की काय आहे ते जाणून घेऊया.

राज्य सरकारने १ एप्रिल २०२३ रोजी माझी कन्या भाग्यश्री या योजनेनंतर लेक लाडकी योजना सुरु केली होती. मुलींच्या जन्माला प्रोत्साहन देण्यासाठी ही योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेत मुलींच्या शिक्षणासाठी आर्थिक मदत केली जाते.मुलींचा मृत्यूदर कमी करणे, बालविवाह रोखण्याच्या उद्देशाने ही योजना सुरु केली आहे.




### लेक लाडकी योजनेचा लाभ कोणाला मिळणार?

लेक लाडकी योजनेअंतर्गत पिवळे आणि केशरी रेशन कार्ड असलेल्या कुटुंबातील मुलींना आर्थिक मदत केली जाते. मुलींच्या जन्मानंतर ५ हजार रुपये दिले जातात. इयत्ता पहिलीत मुलगी गेल्यानंतर ६ हजार रुपये दिले जातात. मुलगी सहावीत गेल्यानंतर ७ हजार रुपये आणि अकरावीत गेल्यानंतर ८ हजार रुपये दिले जातात. तसेच मुलीचे वय १८ वर्ष पूर्ण झाल्यानंतर ७५ हजार रुपये देण्यात येईल. लाभार्थी मुलीला एकूण १ लाख १ हजार रुपये मिळतील.

### योजनेच्या अटी काय?

पिवळ्या आणि केशरी रेशनधारकांच्या कुटुंबामध्ये १ एप्रिल २०२३नंतर जन्माला आलेल्या मुलींसाठी ही योजना लागू करण्यात आली आहे. एका घरातील दोन मुलींसाठी या योजनेत अर्ज करता येतो. लाभार्थी मुलगी महाराष्ट्राची रहिवासी असणे गरजेचे आहे. लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न एक लाखांपेक्षा जास्त नसावे.

### आवश्यक कागदपत्रे

लाभार्थीचा जन्मदाखला, कुटुंबाचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र, आधार कार्ड, पासबुक, रेशन कार्ड, मतदान कार्ड, शाळेचा दाखला, कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया प्रमाणपत्रे ही कागदपत्रे आवश्यक आहेत.

# राणांसारख्या बाजार बुणग्यांना भाजपमध्ये जागा नाही - तुषार भारतीय

## भाजपचा पठ्ठ्या एकटाच भिडला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४ अमरावती**

भारतीय जनता पक्षाचा राणांबद्दल भ्रमनिरास झाला की नाही माहीत नाही. मात्र लोकसभा निवडणुकीच्या अनुभवामुळे रवी राणांचा भाजपवर विश्वास राहिला नाही, हे स्पष्ट आहे. भाजप प्रदेश अध्यक्ष बावनकुळे यांच्या उपस्थितीत त्यांनी 'आपण भाजपमध्ये कधीच जाणार नाही', हे सांगण्याची हिंमत केली.रविवारी झालेल्या दहीहंडी च्या कार्यक्रमात आ.राणांनी आपण भाजप मध्ये कधीच जाणार नसल्याचे जाहीर केले .तर त्यांच्या या वक्तव्याचा भाजप नेते तुषार भारतीय यांनी मात्र चांगलाच समाचार घेतला भारतीय म्हणालेत कि स्वतःच्या बॅनरवर भाजपा नेत्यांचे फोटो लावतो त्यांची मनधरणी करून त्यांना व्यासपीठावर बोलावतो आणि त्यांच्या समोर सांगतो कि मी भाजप मध्ये प्रवेश करणार नाही अरे आता भाजपा मध्ये अश्या बाजारबुणग्यांना जागाच नाही. भाजप चे मते घ्यायचे आणि प्रवेश करणार नाही असे



म्हणायचे त्यामुळे स्थानिक भाजप कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांचा अपमान असल्याचे तुषार भारतीय म्हणाले. या आधी सुद्धा लोकसभेत असेच वागले मोदींची हवा असतांना मी अपक्ष निवडून आली असल्याचे बोलले जात होते. त्यावेळी मोदीजींचा अपमान केला त्यामुळे आता भाजप कार्यकर्ता आणि मतदार या राणा दाम्पत्यांना कंटाळलेला आहे. त्यामुळे अश्याबुणग्यांना ,संधीसाधुंना भाजप मध्ये जागाच नाही वेळ पडली तर भाजप नाही तर पाठिंबा द्या हे आता चालणार नाही. सोयीचे राजकारण करण्यासाठी आता भाजप चा वापर आम्ही होऊ देणार नसल्याचे ही तुषार भारतीय म्हणालेत.

# अमरावती जिल्ह्यातील एसटी कर्मचाऱ्यांचा दुसऱ्याही आक्रमक पावित्रा

## जिल्ह्यात एसटी कर्मचाऱ्यांचा संप सुरू : एसटी सेवा ठप्प



### मागण्या काय?

राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन.
२०१८ ते २०२४ पर्यंतच्या वाढीव महागाई भत्त्याची थकबाकी.
शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे घरभाडे भत्ता व वार्षिक वेतनवाढ.
५८ महिन्यांच्या कालावधीची वार्षिक वेतनवाढीची थकबाकी.
५७ महिन्यांच्या कालावधीचा घरभाडे भत्त्याची थकबाकी.

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

एसटी कर्मचाऱ्यांचे वेतन सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे करावे या मागणीसाठी एसटी कर्मचाऱ्यांच्या कृती समितीने आंदोलनाची घोषणा करण्यात आली आहे,अमरावती जिल्हा मध्यवर्ती बस स्थानक व ग्रामीण भागातील सर्व एसटी डेपो बंद असून सर्व एसटीचे चाके थांबली आहे,तर एसटी कर्मचाऱ्याचं आंदोलन सुरू झाल्याने प्रवाशांचे मोठे हाल सुरु झाले आहे तर दुसरीकडे अमरावती एसटी बस स्थानकात प्रवाशांची मोठी गर्दी निर्माण झाली आहे तर सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी हि करण्यात आली

यापूर्वी राज्य परिवहन मंडळाच्या कर्मचारी संघटनेने ९ आणि १० जुलै रोजी धरणे आंदोलन केले होते. आता कामगार संयुक्त कृती समितीच्यावतीने ३ सप्टेंबरपासून धरणे आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. विविध मागण्यांवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या स्तरावर मागण्यांबाबत तोडगा निघाला तरच आंदोलन मागे घेण्यात येईल, असे संघटनेकडून सांगण्यात येत आहे.अमरावती जिल्हा मध्यवर्ती बसस्थानक आणि ग्रामीण भागातील सर्व एसटी डेपो बंद आहेत. कर्मचाऱ्यांनी या डेपो बाहेरच आंदोलनाला सुरुवात केली आहे. सरकारकडून जोपर्यंत मागण्या मान्य होत नाहीत तोपर्यंत संप मागे घेतला जाणार नाही असा निर्धार कामगारांनी व्यक्त केला आहे. या संपाला आता राज्यातील अन्य जिल्ह्यांतूनही प्रतिसाद मिळू लागला आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर समाधानकारक तोडगा काढला गेला नाही तर आंदोलनाचे लोण राज्यभरात पोहोचण्याची शक्यता व्यक्त होत आहे.मुख्यमंत्री यांच्या स्तरावर आज बैठक बोलाविण्यात आली आहे यावर तोडगा निघेल अशी अपेक्षा आंदोलकांना आहे दरम्यान आज अमरावती आगारातून केवळ परतवाडा व चांदूरबाजार बसेस रवाना झाल्यात जी संघटना संपात सहभागी नाही अश्या सदावर्ते यांच्या संघटनेचे कर्मचारी केवळ परतवाडा आणि चांदुर बाजार फेऱ्या मार्ट आहे उर्वरित बसेच मात्र जागेवरच उभ्या आहेत .

# सांभाळून घ्या, तुम्हालाही मुलं आहेत, दिशा सालियन प्रकरणात उद्धव ठाकरेंनी मला फोन केला, नारायण राणेंचा दावा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४सिंधुदुर्ग**

दिशा सालियन प्रकरणावेळी मिलींद नार्वेकरांनी उद्धव ठाकरेंना फोन लावून दिला होता. मला म्हणाले, आदित्यला सांभाळून घ्या तुम्हालाही दोन मुलं आहेत. मग मी सांगितलं तुमच्या मुलाला असं संध्याकाळी सातनंतर सोडू नका, असा दावा रत्नागिरी-सिंधुदुर्गचे खासदार नारायण राणे यांनी केलाय. ते सिंधुदुर्गमधील पत्रकार परिषदेत बोलत होते.

आपटे कायम स्वरूपी वॉन्टेड राहू शकतो का? त्याला अटक करावी लागेल

नारायण राणे म्हणाले, विरोधकांना दुसरं काय येत. जोडो मारो आंदोलन करणारे पुतळा उभारल्यानंतर आठ महिन्यात एकदा तरी नतमस्तक होण्यासाठी आले का?

हे सगळं झाल्यानंतर डोकं आपटून घेत आहेत. आपटे कायम स्वरूपी वॉन्टेड राहू शकतो का? त्याला अटक करावी लागेल. त्याने माहिती दिल्याशिवाय बांधकाम कुठल्या दर्जाचं होतं? त्याच्यामध्ये काय दोष होता? तेव्हाच कळणार




तुम्ही थोडा वेळ थांबा. विरोधकांना घाई लागली त्यापेक्षा पत्रकारांना जास्त घाई लागली आहे. थोडा वेळ थांबा काहीतरी अडचणी असू शकतात. मी एक विनंती करतो, पुतळा कोसळल्यानंतर किती दिवस झाले? आता दुसरे विषय घ्या जे लोकांच्या उपयोगी आहेत. पुतळा उभारला जाणार महाराजांचा कोणी काही केलं तरी पुतळा उभारला जाणार आणि दर्जेदार बनवणार आहे.

नारायण राणे वडेट्टीवार यांच्याबाबत बोलताना म्हणाले, काय बोलणार विजय वडेट्टीवारला, फक्त नावात विजय आहे. मात्र शब्द उच्चारतात त्यात पराभव दिसतो. कशाला लपवून ठेवणार आपटेला? तुला सर्व मिळणार माहिती, तू विरोधी पक्ष नेता आहेस. माझा चेला असे प्रश्न विचारतो याच दुःख मला वाटतं, असंही राणे यांनी सांगितलं.

# तिवसा येथे महिला स्पेशल बैलपोळा; शेतकरी महिलांनी सजवून आणल्या बैलजोड्या

## आ. यशोमती ठाकूर यांचे यशस्वी नियोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४ तिवसा**

शेतकऱ्यांचा सर्वात मोठा सण सलग दोन दिवस साजरा करण्यात आल्यावर आज तिसऱ्या दिवशी अमरावती जिल्ह्यात तिवसा येथे खास शेतकरी महिलांसाठी पोळ्याचा उत्सव आमदार यशोमती ठाकूर यांच्या नेतृत्वात आयोजित करण्यात आला. या महिला स्पेशल पोळा उत्सवात स्वतः पारंपरिक वेशभूषेत नटून थटून आलेल्या महिलांनी आपल्या घरची सजवलेली बैलजोडी देखील आणली.

सध्याच्या परिस्थितीत शेतकऱ्यांसमोर असणाऱ्या अडचणी या संदर्भातील शेतकऱ्यांच्या वेदनांची माहिती बैलांच्या अंगावर टाकण्यात आलेल्या झुलींवर अंकित करण्यात आली. शासनानं शेतकऱ्यांना मदत करावी या संदर्भात देखील निवेदन स्वरूपातील माहिती अनेक बैलांवरील झुलींवर वाचायला मिळाली. महागाई, शेतकऱ्यांच्या समस्या याकडे देखील महिलांच्या या बैलपोळ्यामध्ये लक्ष वेधण्यात आलं.



**जिल्ह्यात पहिलाच उपक्रम**

महिलांचा बैलपोळा हा अमरावती जिल्ह्यातील पहिलाच उपक्रम आहे. गत पाच वर्षांपासून महिलांचा पोळा आयोजित करण्याचे नियोजन आमदार यशोमती ठाकूर यांनी केलं. कोविड काळामुळे महिलांचा बैलपोळा आयोजित करता आला नाही गतवर्षी मोजक्या महिलांनी बैलपोळामध्ये आपल्या बैलजोडी आणल्या होत्या. यावर्षी मात्र तिवसासह एकूण चार तालुक्यातील महिला मोठ्या संख्येनं या बैलपोळ्यात सहभागी झाल्याचा आनंद आमदार यशोमती ठाकूर यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केला.

**प्रत्येक बैल जोडीला साडेतीन हजार रुपयांचं बक्षीस**

आमदार यशोमती ठाकूर यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या महिलांच्या स्पेशल बैलपोळ्यात सहभागी होणाऱ्या प्रत्येक बैलजोडीला साडेतीन हजार रुपयांची सन्मान धनराशी देण्यात आली. यासह सर्वात उत्कृष्ट बैल जोडीला रोख पंचवीस हजार रुपयांचं पहिलं पारितोषिक, १५००० रुपयांचा द्वितीय, ११००० रुपयांचं तृतीय तर चौथ्या क्रमांकावरील बैल जोडीला साडेसात हजार रुपये रोख बक्षीस देण्यात आलं. महिलांच्या या बैलपोळ्याला प्रचंड गर्दी उसळली. जिल्ह्याचे खासदार बळवंत वानखडे यांच्यासह काँग्रेसचे अनेक पदाधिकारी कार्यकर्ते या सोहळ्यात उपस्थित होते. यावेळी मेळघाटातील आदिवासी बांधवांनी सादर केलेल्या गझली नृत्यात खासदार बळवंत वानखडे आणि आमदार यशोमती ठाकूर यांनी देखील ठेका धरला.